**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५९८/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शेख सलीम शेख अकबर<br>इस्माईलपुरा, कामठी<br>ता कामठी. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक<br>नागपूर विभाग नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा शास्त्र सल्लागार<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे शासकीय कामानिमित्त दौऱ्यावर असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.०९/०८/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी शिक्षण विभाग नागपूर यांचेकडे सन २००९ ते २०१० पर्यंतची महाराष्ट्र शासन परिपत्रक दि.१८ जून २०१० च्या निर्णयानुसार शिक्षक निश्चितीकरणासंबंधीत एकूण दोन मुद्यांवर माहिती मागितलेली असून सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. ०९/०८/२०१० च्या अर्जास अनुसरुन दि.२०/०८/२०१० च्या पत्रान्वये नविन निकषानुसार संच मान्यता झालेला नाही यासाठी माहे ऑक्टोबर २०१० किंवा नोव्हेंबर २०१० महिन्यापर्यंतचा कालावधी लागू शकतो सबब अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याने पुरवू शकत नाही असे अपीलार्थीस कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उप संचालक नागपूर यांचेकडे दि. १४/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात मुद्या क्र.१ बाबत माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अर्जदारास बरोबर आहे व मुद्या क्र. २ ची माहिती अर्जदारास कार्यालयाचे पत्र दिनांक २२/१२/२००९ अन्वये दिलेली आहे तरी माहिती पुनश्च देण्यात यावी  असा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन सदरचे प्रथम अपील निकाली काढले त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४.	अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०९/०८/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे महाराष्ट्र शासन परिपत्रक दि.१८ जून २०१० च्या निर्णयानुसार नगर परिषद, महानगर पालिकेच्या शाळेत वर्ग व तुकडयानिहाय पटसंख्या वर आधारित शिक्षक प्रवर्गातील निश्‍चितीकरण ३० सप्टेंबर २००९ पर्यंत करावयाचे होते त्याची सत्यप्रत. तसेच नगर परिषदेच्या  प्राथमिक शाळेत शिक्षक अतिरिक्त झाले आहेत त्या नवीन  व जून्या शासन निर्णयामध्ये त्यांच्या शाळेतील रिक्त पद आहे त्यांची मुळ स्थनावर वापसी करुन देण्याबाबत माहिती मागितली होती.

५.	जनमाहिती अधिकारी यांच्या वतीने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की,  जनमाहिती अधिकारी  यांनी अपीलार्थीच्या अर्जास अनुसरुन  दि. २०/०८/२०१० च्या पत्रान्वये उत्तर कळविलेले आहे. त्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, नवीन निकषानुसार अद्यापपर्यंत संच मान्य झालेला नाही त्यामुळे यासाठी माहे ऑक्टोबर २०१० किंवा नोव्हेंबर २०१० चा कालावधी लागू शकतो. म्हणून माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले आहे त्यानंतर

अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. सदरची माहिती अपीलार्थी यांना मिळालेली आहे मात्र शासनाकडील दि. १८/०६/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे शिक्षक निश्चितीकरणाची माहिती त्यांना मिळाली नाही असे तक्रारदार यांनी सांगितले. यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, शासनाकडील दि. १८/०६/२०१० च्या शासन निर्णयातील सुचनांप्रमाणे शिक्षक निश्चितीकरणाच्या कार्यवाहीबाबत शिक्षण उप संचालक यांनी दि.०६/०९/२०१० च्या पत्रान्वये शिक्षण संचालक (प्राथमिक) संचालनालय पुणे यांचेकडे मार्गदर्शन मागितले आहे. ते मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर शासनाकडील दि. १८/०६/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे शिक्षण उपसंचालक यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

६. अपीलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, शिक्षण उपसंचालक यांनी दि. ०६/०९/२०१० च्या पत्रान्वये शिक्षण संचालक पूणे यांचेकडून शासन निर्णय दि.१८/०६/२०१० बाबत मागदर्शन मागितलेले आहे ते प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल असे शिक्षण उपसंचालक यांचे म्हणणे आहे म्हणून ही वस्तूस्थिती अपीलार्थीस कळविणे योग्य होईल. त्यासाठी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत शासन निर्णय दि.१८/०६/२०१० नुसार शिक्षक निश्चितीकरणाबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) संचालनालय पूर्ण यांचेकडे दि. ०६/०९/२०१० च्या पत्रान्वये मागदर्शन मागितले आहे त्यांच्याकडून मागदर्शन प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. असे स्पष्टपणे अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावे.

तसेच त्यासोबत दि. ०६/०९/२०१० च्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५९७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शेख सलीम शेख अकबर<br>इस्माईलपुरा, कामठी<br>ता कामठी. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक<br>नागपूर विभाग नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा शास्त्र सल्लागार<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे शासकीय कामानिमित्त दौऱ्यावर असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ११/०१/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे ३ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदर माहितीत नगर परिषदेतून नगर परिषद, महानगर पालिका तसेच जिल्हा परिषदेतील शिक्षक बदली नियम व जी. आर. (प्राथमिक ते प्राथमिक ), (प्राथमिक ते माध्यमिक), इत्यादी बाबतची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. ०८/०२/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू मुद्या क्र. ३ बाबत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२६/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली. प्रथम अपीलाच्या निर्णयात मुद्या क्र. १ व २ बाबत शासन निर्णयाची माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे. मुद्या क्र. ३ बाबतचे शासन निर्णय कार्यालयात उपलब्ध नाही असे नमूद करुन सदरचे प्रथम अपील निकाली काढले आहे. त्यामुळे अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांना मुद्या क्र. १ व २ ची शासन निर्णयाची माहिती उपलब्ध झालेली आहे मात्र मुद्या क्र.३ बाबतची माहिती त्यांना मिळालेली नाही. तसेच शिक्षण उपसंचालक यांनी त्यांच्या दि. ०२/०९/२००९ च्या पत्रान्वये मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे श्रीमती आशिया बानो रशिदी, सहाय्यक शिक्षीका जिल्हा परिषद उर्दु कन्या शाळा दारव्हा जि. यवतमाळ, यांची नगरपरिषद कामठी येथे बदलीने सेवावर्ग होण्या बाबतच्या पत्रामध्ये स्थायी निर्देष क्र. २२ अ मधील अटी व शर्ती दिलेल्या आहेत त्यामध्ये बदलीची मागणी करणारे कर्मचारी महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती औद्योगिकनगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये मंजुरी दिलेल्या पदावरील कर्मचारी असावेत असे आहे म्हणून या मुद्याबाबत माहिती पाहिजे आहे परंतू त्यांना त्याबाबतची माहिती देण्यात आली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलार्थीने सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी हे सुनावणीस गैरहजर असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०८/०२/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती बरोबर आहे. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. १ व २ चे शासन निर्णय अपीलार्थीस उपलब्ध करुन दिले आहेत. मात्र मुद्या क्र.३ बाबतचे शासन निर्णय त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही त्यामुळे ते अपीलीार्थीस

उपलब्ध करुन देता येणार नाही व तसे अपीलार्थीस कळविलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलार्थीस मुद्या क्र. ३ बाबतची माहिती देण्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत दि.०२/०९/२००९ च्या पत्रास अनुसरुन मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांना कळविलेल्या निर्देश क्र. २२ मधील अटी व शर्तीतील वर नमूद केल्याप्रमाणे मुद्या क्र. ३ बाबतची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५९९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अभय राजेश संघवी<br>श्री ए. एन. जोशी रा. साईबाबा कॉलोनी, केन्टॉन्मेंट हाईवे नंबर ७, कामठी<br>ता कामठी. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पोलीस अधीक्षक कार्यालय वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्या)<br>पोलीस अधीक्षक कार्यालय वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांच्या वतीने ॲड. शिरपूरकर हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तथा अप्पर पोलीस अधिक्षक श्री उ. ज. जाधव हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय जिल्हा वर्धा यांचेकडे दि. १०/०८/२०१० रोजी श्री अश्विनी कुमार हांडा वरिष्ठ लिपीक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वर्धा यांनी त्यांचे कुटुंबियांच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाबाबत एकूण २१ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती स्पीड पोस्टने घेणार असे नमूद केलेले आहे.

३.	अपीलकर्ता हे गैरहजर असून त्यांच्या वतीने त्यांचे ॲड. श्री शिरपूरकर यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच दि.०८/१२/२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली परंतू त्यातील मुद्या क्र. १६ व १७ ची जी माहिती दिली आहे ती अपूर्ण आहे व सदर माहिती ४ महिन्याच्या विलंबाने दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती देण्यात यावी असे आग्रही प्रतिपादन ॲड. शिरपूरकर यांनी केले आहे.

४.	जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) पोलीस अधीक्षक कार्यालय वर्धा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी श्री अश्विनीकुमार हांडा वरिष्ठश्रेणी लिपीक हे त्यांच्या आस्थापनेवर असतांना त्यांच्या आईचे व कुटुंबीयांचे १०६ वैद्यकीय प्रतीपूर्तीचे देयके सादर केले होते. त्यापैकी ५० वैद्यकीय देयकांची रक्कम ५,८५,७२३/- (पाच लाख पंचऐंशी हजार सातशे तेवीस) त्यांना अदा करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत ५६ वैद्यकीय देयकांपैकी ४४ देयके हे वैद्यकीय अधिकारी यांचेकडे पोलीस अधिक्षक कार्यालय वर्धा यांचेकडून दि.२०/०१/२०१० रोजी प्राप्त झाले असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. अपीलकर्ता यांनी श्री अश्विनीकुमार हांडा यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयकाबाबतची माहिती प्रत्येक बिलांचे दिनांकासहीत विवरण व किती दिवसात कार्यवाही केली अशी माहिती मागितलेली असल्यामुळे त्या बिलांमधील त्या त्या तारखेचा रेकॉर्ड पाहून आवक जावक नोंदवहीच्या सन २००६ पासून नोंदी तपासून तसेच प्रलंबित देयके हे मंजुरीसाठी वैद्यकीय अधिकारी, पोलीस रुग्णालय वर्धा यांचेकडे पाठविण्यात आले होते. परंतू त्याची स्थळ प्रत कार्यालयात ठेवलेली नसल्यामुळे सदर बिले वैद्यकीय अधिकारी, पोलीस रुग्णालय वर्धा यांचे कार्यालयात जावून प्रलंबित देयकाच्या मुळ प्रतीतून माहिती व त्यामधील आक्षेप तपासून माहिती प्राप्त करुन देण्यास संबंधीत लिपिकास जास्त वेळ लागणे अपेक्षित होते. तसेच संबंधीत लिपीक यांचेकडे या आस्थापनेच्या बिनतारी संदेश विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन देयके, पोलीस रुग्णालय येथील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन देयके व कार्यालयीन वर्ग-४ यांचे वेतन देयके इतर कामकाज असल्यामुळे सदर कामकाजातून वेळ काढून माहितीचा मसुदा तयार करण्यास उशिर लागलेला आहे. सदरची माहिती प्रमुख लिपिकाने तयार केलेली असून त्यात बऱ्याच उणिवा व त्रुटी दिसून आल्याने सदर माहिती पुन्हा तपासून उपलब्ध करुन देण्यास संबंधीतास सांगितले असल्यामुळे त्यांना माहितीच्या

त्रुट्या पुन्हा पूर्ण करुन फेर तपासणी केल्यानंतर अपीलार्थीस माहिती पाठविण्यात आलेली आहे. म्हणून माहिती उपलब्ध करुन देण्यास वरील कारणास्तव विलंब झाला आहे.

६. अपीलकर्ता यांचे वकील व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि.०८/१२/२०१० च्या पत्राने १ ते २१ मुद्याची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीची व्याप्ती पाहिली असता माहिती ही फार मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांने मागितलेली वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलांची संख्या ही सुमारे १०६ बिलांची दिसून येते. त्यामुळे माहिती काढण्यास विलंब झालेला दिसून येतो. परंतू अपीलार्थीस दि. ०८/१२/२०१० च्या पत्राद्वारे पाठविलेल्या माहितीत मुद्या क्र. १६ व १७ ची माहिती अपूर्ण असल्याचे अपीलकर्ता यांच्या वकीलाने सुनावणीत सांगितले. त्यामुळे मुद्या क्र. १६ व १७ मधील मुद्यांच्या माहितीची वस्तुस्थिती अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र.१६ व १७ च्या माहितीची जी वस्तुस्थिती आहे ती विनामुल्य व्यक्तीशः रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६०१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री बाबाराव पांडूरंगजी पाटील<br>गणेशनगर, बोरगांव (मेघे) वार्ड क्र.४<br>ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सिरस्तेदार<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १९/०४/२०१० च्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे श्री देवानंद ज्ञानेश्वर दखने, रा. सिध्दार्थ नगर, बोरगांव (मेघे), ता.जि. वर्धा यांनी जातीचे प्रमाणपत्र काढण्याकरिता जोडलेल्या कागदपत्राची माहिती मागितलेली आहे. सदर माहितीचा दिनांक हा ०७/०३/२००९ असून माहिती व्यक्तिशः व शिघ्र घेणार असे नमूद केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय वर्धा, यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन अपीलकर्ता यांना दि.१८/०५/२०१० च्या पत्रान्वये श्री देवानंद दखने यांचे जात प्रमाणपत्राबाबतची कागदपत्रे अभिलेख कक्षात तसेच ग्रामदूत सेवा केंद्र यांना पत्र देवून व शोध घेऊनही अद्याप प्रकरण उपलब्ध होवू शकलेले नाही. त्यामुळे माहिती पुरविता येऊ शकत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.०३/०६/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कार्यालय वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०४/०९/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपीलार्थी यांचे अपील मंजूर करण्यात येवून तहसिलदार वर्धा यांनी सदर प्रकरणाचा ग्रामदूत मार्फत शोध घेवून ते जमा केल्याबाबत खात्री करावी अन्यथा ग्रामदूत मार्फत सदर प्रकरणाचा शोध घेऊन मूळ प्रकरण या कार्यालयाला सदर आदेश प्राप्त होताच १० दिवसात सादर करावे असे प्रथम अपीलाच्या आदेशात नमूद केले आहे. मात्र अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २५/११/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, श्री ज्ञानेश्वर दखने, रा. सिध्दार्थ नगर, बोरगांव (मेघे), ता.जि. वर्धा यांनी जातीचे प्रमाणपत्र काढण्याकरिता जोडलेल्या कागदपत्राची माहिती मागितली असता जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहितीचा शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकत नाही असे कळविल्यामुळे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

५. आजच्या सुनावणीस विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सिरस्तेदार उपविभागीय अधिकारी कार्यालय, श्री गडपायले हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला त्याला अनुसरुन तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दि. १८/०५/२०१० च्या पत्रान्वये श्री देवानंद दखने यांचे जात प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रकरण अभिलेख कक्षात उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. सदर पत्र तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री नागोसे यांनी दिलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयातील आदेशानुसार पून्हा श्री देवानंद दखने यांना

दिलेल्या जात प्रमाणपत्राच्या प्रकरणाचा शोध घेण्यात आला. त्यासाठी जबाबदार अधिकारी म्हणून एका नायब तहसिलदाराची नेमणूक केली. तथापी त्यांनी त्या प्रकरणांचा शोध घेऊनही अभिलेख कक्षात सदरचे प्रकरण आढळून आले नाही. त्याबाबतचा दि. २९/०७/२०१० चा लेखी अहवाल उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर केले आहे असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वर्धा हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल करण्यात आले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली त्यानंतर दि. ०४/०९/२०१० रोजी निर्णय देण्यात आला. त्यात अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला परंतू सदर प्रकरणाचा अद्यापही शोध लागलेला नसल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकाराखाली श्री देवानंद दखने यांना देण्यात आलेल्या जात प्रमाणपत्रांच्या प्रकरणातील कागदपत्रांची माहिती मागितली होती. शासनाच्या सूचनेप्रमाणे प्रत्येक तहसिल कार्यालयात नागरी सुविधा केंद्र किंवा ग्रामदूत केंद्र या नावाने खाजगी संस्थांशी करार करुन हे केंद्र स्थापित करण्यात आलेले आहे. या केंद्रामार्फत नागरिकांना विविध प्रकारचे दाखले निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच जातीचे प्रमाणपत्र देखील या केंद्रामार्फत निर्गमित केल्यानंतर त्या संबंधातील सर्व धारिका या तहसिलदार यांच्या अभिलेख कक्षात ग्रामदूत केंद्राने जमा करणे आवश्यक आहे असे विद्यमान जनमाहिती अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितल्यामुळे श्री देवानंद दखने यांना देण्यात आलेल्या जातीच्या प्रमाणपत्रांच्या संबंधातील धारिका ग्रामदूत केंद्र वर्धा यांच्या अभिलेख कक्षात जमा करणे आवश्यक होते मात्र ग्रामदूत केंद्राने सदरचे प्रकरण का जमा केले नाहीयाचा लेखी खुलासा उपविभागीय अधिकारी यांनी मागवावा. सदरचा लेखी खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्या प्रकरणाचा शोध घ्यावा व प्रकरण प्राप्त झाल्यास अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा कराराप्रमाणे ग्रामदूत केंद्रावरती योग्य ती कार्यवाही प्रस्तावीत करणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय वर्धा यांनी प्रस्तुत प्रकरणात ग्रामदूत केंद्राने अद्यापपावेतो सदरचे प्रकरण तहसिलदार वर्धा यांच्या अभिलेखात का जमा केले नाही याबाबतचा खुलासा मागवावा व त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणाचा कसून शोध घ्यावा आणि प्रकरण प्राप्त झाल्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी प्रकरण प्राप्त न झाल्यास संबंधीत ग्रामदूत केंद्रावरती कराराप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकून योग्य ती कार्यवाही उपविभागीय अधिकारी वर्धा यांनी करावी. तसेच याबाबत स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६०५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नितीन गोवर्धन कापसे<br>मनोहर चौक, गांधी वार्ड क्र.२२, साईनाथ दुग्ध डेअरीच्यामागे, गोंदिया<br>मु. पो. ता. जि. गोंदिया - ४४१ ६०१ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय<br>गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सिरस्तेदार<br>जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय<br>गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे शासकीय दौऱ्यावर असल्याने त्यांच्या वतीने जनमाहिती अधिकारी हेच प्राधिकृत झाले आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०९/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, ता. जि. गोंदिया यांचेकडे खालील दोन मुद्यांवरती शिपाई पदाच्या भरतीबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

१. निवड केलेल्या उमेद्वारांना नियुक्तीपत्र पाठविल्याबाबतचा पुरावा.

२. ज्यादिवशी निवड केलेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्र पाठविण्यात आले त्यादिवशी हजर असलेल्या कर्मचाऱ्यांचे कार्यालयातील हजेरीपट मिळण्याबाबतची सविस्तर माहिती.

याप्रकारची माहिती मागितलेली असून सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जास अनुसरुन दि. २४/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती विलंबाने दिलेली असून ती चुकीची व अपूर्ण असल्याचे अर्जात नमूद करुन अपीलकर्ता यांनी दि. ११/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे माहिती मागितली असता त्यांनी दि. २४/०१/२०११ च्या पत्रान्वये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती चुकीची व अपूर्ण आहे. तसेच सदर माहिती ही ३ महिने विलंबाने दिलेली असून ४१ उमेदवारांची पदभरतीची माहिती मागितली असता ४२ उमेदवारांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तेव्हा १ ज्यादा पदावर कोणास नियुक्त करण्यात आले आहे. व ४१ पदभरती असतांना ४२ पदे भरण्यात आलेली दिसून येतात म्हणजेच बेकायदेशीर रित्या एक ज्यादाचे पद भरण्यात आले आहे असा अपीलार्थीने आयोगासमोर मुख्य मुद्या उपस्थित केला. त्यामुळे प्रथम अपील दाखल केले मात्र प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही. व प्रथम अपीलाची प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीच दखल घेतलेली नाही म्हणून अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय गोंदिया श्री कोटांगले यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०६/०९/२०१० रोजी प्राप्त झाला असून त्याला अनुसरुन माहिती तयार करण्यात आली. मात्र कार्यबाहुल्यामुळे अपीलकर्त्यास मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. माहिती उपलब्ध करुन देण्यास उशिर लागेल म्हणून याबाबत अपीलकर्त्यास

दि.१६/१०/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले असून त्या पत्रात सदरची माहिती देण्याकरिता एक आठवडयापेक्षा जास्त कालावधी लागू शकतो असे नमूद केले आहे मात्र त्यांनतर अपीलकर्त्याने मागितलेल्या दोनही मुद्यांची माहिती तयार करण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. २४/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आली. दि.२४/०१/२०११ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती दि. २७/०१/२०११ रोजी प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र ती माहिती चुकीची आहे असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे. परंतू ४१ उमेदवारांची निवड केली असतांना ४२ उमेदवारांची निवड यादी आहे यात एक ज्यादाचे पद कसे नियुक्त करण्यात आले याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास ज्या दिवशी पोस्टाने निवड पत्रे पाठविलेली आहेत त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर असलेल्या कर्मचाऱ्यांची हजेरीपटाची सत्यप्रत अपीलकर्त्याने मागितली होती. उमेदवारांना ३० एप्रिल रोजी निवडपत्रे पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. तथापी कार्यालयात हजेरी रजिस्टर हे संपूर्ण एप्रिल महिन्याचे असते म्हणून अपीलकर्त्यास संपूर्ण एप्रिल २०१० च्या हजेरी रजिस्टरची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिली आहे. आणि सदर रजिस्टरच्या झेरॉक्सची पाहणी केली असता दि. ३०/०४/२०१० रोजी उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सह्या त्यावर करण्यात आलेल्या आहेत. याबाबत अपीलार्थीची खात्री करुन देण्यात आली. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची कोणतीही दखल घेतलेली नसल्याचे दिसून येते. परंतू ते पूणे येथे दौऱ्यावर असल्यामुळे आज सुनावणीस ते गैरहजर आहेत त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. वास्तविकपाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर ३० दिवसांचे मुदतीत किंवा कारणे देऊन ४५ दिवसाचे मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय देणे बंधनकारक असते म्हणून प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन त्यावर निर्णय का दिलेला नाही याबाबत त्यांनी आयोगाकडे लेखी खुलासा १५ दिवसाचे आत सादर करणे आवश्यक आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विलंबाने एक व दोन मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू मुद्या क्र. १ मध्ये ४१ उमेदवारांची निवड झालेली असतांना ४२ उमेदवारांना पत्र पाठविल्याचे दिसून येते. म्हणून एका ज्यादा उमेदवारास निवड पत्र देण्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ४१ उमेदवारांची जाहिराती प्रमाणे निवड केली असतांना ४२ उमेदवारांना निवड पत्रे पाठविलेली दिसतात म्हणून एका जादा उमेदवारास निवड पत्र पाठविल्याची वस्तुस्थिती अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून माहिती विलंबाने का उपलब्ध करुन दिली याचा लेखी खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत सादर करावा अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय का दिला नाही याचा खुलासा हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा अन्यथा त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

४.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १६७०/नाग/२०१०**

१. श्री केशव मनिराम चहांदे - **अपीलकर्ता**
रा. ५१०, अर्जुन अपार्टमेंट, चंदन नगर, उंटखाना चौक,
मेडिकल कॉलेज रोड, नागपूर - ९

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क) - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. सांघिक कार्यालय,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई-४०००१९

३. जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (क-अंता-आस्था) - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
४ था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१

**(आदेश पारित दिनांक १८/०२/२०११)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २९/०७/२०१० च्या माहितीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा (मुख्य महाव्यवस्थापक, सांघीक संवाद) म. रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित मुंबई, यांचेकडे सन १९८२ पासून ते आजपर्यंतच्या कालावधीतील म. रा. विद्युत मंडळ (जुने) आताचे महावितरण कंपनी मध्ये सेवाकाळ एक वर्ष पूर्ण होवूनही जन्मतारखेत बदल करण्यासाठी केल्या गेलेले अर्ज विचारात घेवून निकाली काढण्यात आलेल्या विनंती

अर्जाद्वारे अथवा न्यायालयीन निर्वाळाद्वारे संबंधीत आदेशाची साक्षांकित प्रती मिळणेबाबतची माहिती मागितलेली आहे.

३.      जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि. ०४/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीने मागितलेली माहिती ही कुठल्या कार्यालयाबद्यल किंवा कुठल्या संवर्गाबद्यलची आहे त्याचा नेमका बोध होत नाही व अत्यंत मोघम स्वरुपाची माहिती मागितली असून अशा माहितीसाठी अत्यंत शोधाशोध निगडीत आहे त्यामुळे सदर माहिती माहितीचा अधिकारी अधिनियम -२००५ मधील कलम ७ (९) प्रमाणे नाकारण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच तांत्रीक व अतांत्रीक अशा सर्व संवर्गातील जन्मतारखेच्या बाबत एकवर्षाच्या सेवा झाल्यानंतर न्यायालयीन विनंती अर्जाद्वारे दुरुस्त करण्यात आलेली सर्व प्रकरणांच्या सत्यप्रती मिळाव्यात अशी मागणी केली होती. त्यामुळे अपीलकर्ता यांनी  प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक म. रा. वि. वि. कं. मर्या. सांघिक कार्यालय, माटुंगा मुंबई यांचेकडे दि. ०६/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १८/१०/२०१० रोजी देण्यात आला असून सदर निर्णयात दि.०६/०९/२०१० चे अपील पत्राबाबतची विस्तृत माहिती पुरविण्याकरिता शोधाशोध करण्याकामी पुष्कळसे मनुष्यबळ लागणार असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सूचित केले. या कामासाठी साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे याबाबत आपणास कळविण्यात आले असून सदर खुलाशाशी सहमत असल्याचे नमूद करुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील फेटाळले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.      अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी त्यांच्या जन्मतारखेच्या बदलासंबंधीची १९८२ पासून जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि. २९/०७/२०१० रोजी  माहिती मागितली होती. तसेच महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीमध्ये सेवाकाळ एक वर्ष पूर्ण होवूनही जन्मतारखेत बदल करण्यासाठी केलेला अर्ज विचारात घेऊन निकाली काढण्यात आलेल्या आदेशाच्या साक्षांकित प्रती सन १९८२ पासून आजपर्यंतच्या मिळाव्यात म्हणून विनंती केली होती परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.०४/०८/२०१० च्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (९) प्रमाणे संपूर्ण साधनसामग्री या कामासाठी

प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याच्या कारणास्तव माहिती देण्यास नकार दिलेला आहे. म्हणून प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचेशी सहमत असल्याचे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद करुन प्रथम अपील फेटाळले त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस दि.०४/०८/२०१० च्या पत्रान्वये त्यांनी मागितलेल्या माहितीचे स्पष्टीकरण कळविले आहे. कारण अपीलार्थीने मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची व जूनी असून ती नेमक्या कोणत्या कार्यालयाबद्यल व किंवा संवर्गाबद्यल विचारलेली आहे याचा बोध होत नाही त्यामुळे याबाबत शोधाशोध करावी लागेल व त्यासाठी संपूर्ण साधनसामुग्री याच कामाकडे वळवावी लागत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (९) अन्वये माहिती देता येत नाही असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचे मताशी सहमत असल्याचे कळविलेले आहे.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती पैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना पुरविणे आवश्यक आहे व महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्या. यांचेकडे यंत्रणा उपलब्ध असल्यामुळे तसेच अपीलकर्त्याने माहितीचा कालावधी अर्जात नमूद केला असल्याने माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत दिसून येत नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. हे नव्याने स्थापन झालेले आहे त्यामुळे जुन्या माहितीचा रेकॉर्ड त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितची स्थापना झाल्यापासून त्यांच्या कार्यालयातील आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

आणि सदरची माहती जनमाहिति अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर मान्य केले. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिति अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितची स्थापना झाल्यापासून त्यांच्या कार्यालयातील आस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांची अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिति विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५९३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री आर. एन. बावरकर<br>साई मंदिराजवळ, तकिया वार्ड, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे अधिक्षक श्री वाय. एस. हरडे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये दि. १७/०३/२०१० रोजी श्री आनंद बाभरे सहाय्यक शिक्षक, पंचायत समिती भंडारा यांच्या नेमणूकीची तारीख, त्यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण झाले काय? झाले असल्यास प्रशिक्षणाच्या आदेशाची तारीख व वर्ष याची झेरॉक्स प्रत, सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पात्रतेच्या शासकीय अटी व त्यांच्या पत्नीच्या बदलीची कारणे, अशाप्रकारे एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि. २२/०३/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्याने मागितलेल्या श्री आनंद बाभरे यांची माहिती ही पंचायत समिती अंतर्गत स्तरावरील असल्याने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती भंडारा यांना अपीलकर्त्यास सदर माहिती पुरविण्याबाबत कळविलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच त्यांनी आयोगापुढे कोणताही लेखी खुलासा सुध्दा सादर केला नाही.

५. जनमिहती अधिकारी तथा अधिक्षक गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती भंडारा व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधि अधिक्षक श्री हरडे हे सुनावणीस उपस्थित आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने दि. १७/०३/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे न करता शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे केला. वास्तविक पाहता सदरचा अर्ज त्यांनी संबंधीत जनमाहिती अधिकारी यांचेकडे करणे आवश्यक होते. शिक्षणाधिकारी (प्राथ) जि. प. भंडारा यांचेकडून सदरचा अर्ज पंचायत समिती भंडारा यांचेकडे दि. २२/०३/२०१० ला पाठविण्यात आला. आणि सदर अर्ज प्रत्यक्षात जनमाहिती अधिकारी पंचायत समिती भंडारा यांचेकडे दि. २५/०३/२०१० ला प्राप्त झाला. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबधित असल्यामुळे त्रयस्थ व्यक्तीस त्याच्या बद्यलची माहिती अपीलार्थीस पुरविण्याची विचारणा केली असता त्रयस्थ व्यक्तीने दि.१५/०४/२०१० च्या पत्रान्वये माहिती मागणाऱ्या व्यक्तीस ओळखत नसल्याचे व सदर व्यक्ती माहितीच्या अधिकाराचा गैरउपयोग करणार नाही याची शक्यता नाकारता येत नाही अशी हरकत दर्शवून जनमाहिती अधिकारी यांना कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती देऊ शकत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने दि.०४/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) जि. प. भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यानुसार अपीलकर्त्यास दि.०७/०९/२०१० आणि दि.०१/१०/२०१० ला प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू सदर दोन्ही अपीलांच्या सुनावणीस अपीलकर्ता हे जाणून बुजुन गैरहजर राहिले त्यामुळे त्यांनी मागितलेल्या माहितीविषयी

त्यांना काही आवश्यकता दिसून येत नाही त्यामुळे सदरचे प्रथम अपील खारीज करण्यात आले. त्यानंतर अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

६. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत आहे त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षास माहिती देणेबाबत संमती मागितली असता त्रयस्थ पक्षाने अपीलकर्त्यास माहिती देवू नये अशी हरकत दर्शविली त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच अपीलकर्ता यांना दोनवेळा प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देवूनही ते जाणूनबुजुन उपस्थित झाले नाही. व आज द्वितीय अपीलाच्या सुनावणीस देखील ते गैरहजरच आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त घेण्याची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५८९/नाग/२०१०</u>**

१. श्री मोहन वासुदेव केळकर - **अपीलकर्ता**
प्लॉट नं. ९०, उषःकाल बिल्डिंग, गांधीनगर, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (पदुम) - **उत्तरवादी**
कृषी व पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय मुंबई-३२

३. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदुम) - **उत्तरवादी**
कृषी व पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय मुंबई-३२

**(आदेश पारित दिनांक ०१/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २२/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (पदुम) मंत्रालय मुंबई यांचेकडे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल केलेल्या दावा क्रमांक ६४१/१९९६ प्रकरणी न्यायाधिकरणांनी दि.१६/०३/२००९ रोजी शासनाने सहा महिन्यात निर्णय घ्यावा असे आदेश दिले होते, त्या अनुषंगाने संबंधित विषयाच्या फाईल मध्ये केलेल्या/घेतलेल्या सर्व शिपायांच्या नोंदीच्या छायांकित प्रती तसेच अंतिम कार्यवाहीच्या प्रती मिळणेबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि. ०९ ऑगस्ट २०१० च्या पत्रान्वये माहितीसाठी प्रत्येकी रु. २/- प्रमाणे ६५ प्रतींसाठी १३० रुपये या विभागातील रोखशाखेत भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (पदुम) मंत्रालय मुंबई यांचेकडे दि. २५/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०७/१०/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामधे जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे माहितीसाठी रु. १३० चा भरणे करणे आवश्यक असून फी चा भरणा केल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी फी चा भरणा केल्यानंतर त्यांना मुद्या क्र. १ व २ बाबतची माहिती उपलब्ध झालेली आहे. मात्र मुद्या क्र. ३ व ४ ची माहिती त्यांना अद्यापही उपलब्ध झालेली नाही. तसेच दि. ०९/०९/२०१० रोजी जी माहिती देण्यात आली त्यात या अगोदर पाठविलेली मुद्या क्र. १ व २ ची माहितीच आहे. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कृषी व पशुसंवर्धन दुग्ध विकास व मत्स्य विकास व्यवसाय मंत्रालय मुंबई हे आज सुनावणीस उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि. ३१/०७/२०१० रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन माहिती काढण्यात आली आणि सदरच्या माहितीची फी भरण्यासाठी अपीलार्थीस दि. ०९/०८/२०१० रोजी फी चा भरणा करणेबाबत कळविण्यात आले त्यानंतर अपीलार्थीने माहितीच्या फी चा भरणा दि.०९/०९/२०१० रोजी केला असून त्यांना एकूण ६३ पेजेसची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना मुद्या क्र. १ व २ ची माहितीच देण्यात आली मात्र मुद्या क्र. ३ व ४ ची माहिती देण्यात आलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी

आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा मुद्या क्र. ३ बाबत लोकआयुक्त यांचेकडे कोणताही अहवाल सादर केलेला नाही. तसेच मुद्या क्र. ४ बाबतची धारिकाही मा. मंत्रीमहोदयांकडे सादर केलेली होती त्यामुळे ती माहिती अपीलार्थीस देता आली नाही. मात्र आता सदरची धारिका मा. मंत्रीमोहदयांकडून प्राप्त झालेली आहे त्यामुळे अपीलार्थीस आत ती माहिती उपलब्ध करुन देण्याची संमती जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. तसेच आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर होते. त्यांनी दिलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयात जनमाहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णयात नमूद केलेले आहे.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि.०९/०९/२०१० च्या पत्रान्वये एकूण ६३ पेजेसची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी माहिती अर्जातील मुद्या क्र. ३ बाबत लोकायुक्तांकडे कोणताही अहवाल सादर केलेला नाही असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क्र. ४ बाबतची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र.३ व मुद्या क्र.४ बाबतची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६१७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भारत प्रभाकर राजगुरु<br>डॉ पाल चौकाजवळ, इंदिरा गांधी वार्ड, रेलटोली, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया - ४४१ ६१४ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (नझुल)<br>तहसिल कार्यालय गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०५/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे रजेवर असल्याने ते गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये दि.२७/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी (नझुल) उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांचेकडे ऋुण वसूली अधिकारी DRT नागपूर द्वारा प्रदत्त Sale Certificate रजिस्टर करण्यासंबंधी निवेदन दिले आहे त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या दस्तऐवजांच्या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १३/०३/२००८ ला शिट नं.२, प्लॉट नं. ९/४, ९/५, ९/६ आणि ९/७ चे कर्ज वसूली अधिकारी DRT नागपूर यांचेकडून प्रदत्त विक्रीपत्र नोंदणीकृत करण्याकरिता नाहरकत प्रमाणपत्र घेण्याकरिता उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचे कार्यालयात सादर केले होते. आणि त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती परंतू जनमाहिती अधिकारी यांनी माहिती विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात त्यांना १० दिवसात माहिती देण्याचे आदेश असतांनाही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत सांगितले.

४. विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री बी. डी. टेंढे उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या वेळी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार गोंदिया म्हणून श्री डी. पी. रहांगडाले हे कार्यरत होते. त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती अपीलकर्त्यास मुदतीत उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापी उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन श्री रहांगडाले तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दि.२४/०८/२०१० च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी गोंदिया यांना असे कळविले की, संबंधीत अव्वल कारकुन (नझुल) यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविणे आवश्यक आहे व तसे संबंधितास निर्देष देण्यात यावे असे तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याचे दिसून येते. आणि सदर पत्राची प्रत अपीलकर्ता यांना अग्रेषित केलेली दिसून येते. परंतू सदर पत्राची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली नाही म्हणून आयोगासमोर विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सदर पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली.

६. अपीलकर्ता व विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असता प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दि. २४/०८/२०१० च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी गोंदिया यांच्या कार्यालयात अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जावर कार्यवाही करवयाची आहे असे कळविलेले असून त्याची प्रत अपीलार्थीस अग्रेषित केलेली आहे. परंतू अपीलकर्तास ती प्रत प्राप्त न झाल्यामुळे त्यांना आज आयोगासमोर ती प्रत उपलब्ध करुन दिली. त्यामुळे सदरच्या प्रकरणात उपविभागीय अधिकारी गोंदिया याचे

कार्यालयाकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे त्यामुळे उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचे कार्यालयाने केलेली कार्यवाही अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक होईल. मात्र या प्रकरणात असेही दिसून येते की, तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री डी. पी. रहांगडाले यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि.३०/०४/२०१० रोजी प्राप्त होवूनही ३० दिवसांचे आत अपीलकर्तास का माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही याचा कोणतीही खुलासा विद्यमान जनमाहिती अधिकारी हे करु शकले नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध होण्यास झालेल्या विलंबाबद्यल श्री डी. पी रहांगडाले हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही प्रस्तावित करणे योग्य होईल. तथापी शास्ती लादण्यापूर्वी तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा मागविणे योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री डी. पी. रंहागडाले यांनी अपीलकर्त्याच्या माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. ३०/०४/२०१० रोजी प्राप्त होवून त्याची कोणतीही दखल घेतलेली नाही. आणि ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु १०,०००/- ची शास्ती का लादण्यात येवू नये याचा लेखी खुलासा हा निर्णय मिळल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल.

२. सदरच्या निर्णयाची प्रत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री डी. पी. रहांगडाले यांचेकडे खुलाशासाठी पाठवावी.

३.   सदर निर्णयाची एक प्रत उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४.   अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६१६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती विमल रवी खोब्रागडे<br>मु. पो. वेलतुर<br>ता. कुही जि. नागपूर | - | **अपीलकर्ती** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक<br>सहकारी संस्था, नागपूर<br>८, सहकार सदन, हिंदुस्थान कॉलनी, अमरावती रोड, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था, कुही<br>ता. कुही जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०५/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०५/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या तर्फे श्री आर.डी.मुन हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री टी. एन. चव्हाण हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कुही, जि. नागपूर यांचेकडे दि. २७/०६/२०१० रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०१० मध्ये झाली होती त्याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने देण्यात यावी असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि. १२/०७/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदर पत्रामध्ये अपीलार्थीने बाजारसमितीच्या ग्रामपंचायत मतदार संघातील निवडणूकीत उभे असलेल्या उमेदवारांचे नामांकन पत्र व इतर दस्तऐवज मागणी केलेली आहे परंतू निवडणूकी संबंधीचे संपूर्ण दस्तऐवज सिलबंद करण्यात आले असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ नुसार माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सदर पत्रात नमूद केले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय नागपूर यांचेकडे दि. १०/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७/०९/२०१० रोजी देण्यात आला आहे. श्रीमती विमल रवि खोब्रागडे यांनी माहितीच्या अर्जात कृषी उत्पन्न बाजार समिती, संचालक मंडळ निवडणूकी संदर्भात विविध मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका कुही यांनी त्यांचे दि.१२/०७/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविली असे नमूद करुन प्रथम अपील खारीज केले आहे.

४. अपीलकर्ती ह्या आजच्या सुनावणीस गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे उपस्थित असलेले श्री मून सहकार अधिकारी श्रेणी-२ यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला त्याला अनुसरुन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दि. १२/०७/२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपीलकर्त्याने मागितलेली माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बाबत आहे. सदर निवडणूक दि.११/०४/२०१० रोजी घेण्यात आली आणि सदर निवडणूकीचा निकाल दि. १२/०४/२०१० रोजी जाहिर करण्यात आला. आणि या निवडणुकी संबंधिचे इतर कागदपत्रे निवडणूक अधिकारी यांनी सिलबंद करुन सदर दस्तऐवज कमीतकमी एक वर्ष किंवा मा. न्ययायालयाचे काही आदेश असल्यास सुरक्षित ठेवण्यात यावी असे सदर पत्रात स्पष्ट नमूद केल्यामुळे सदरची सिलबंद कागदपत्रे समितीकडे असून आता अपीलार्थीस उपलब्ध करुन देता येणार नाही. व तसे अपीलार्थीस दि.१२/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र जी माहिती

सिलबंद केलेली आहे ती माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले आहे आणि ते योग्य दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६३१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री के. आर. पारेलवार<br>सेकंड दाल ओली, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक<br>पोलीस अधिक्षक कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पोलीस अधिक्षक कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०८/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय चंद्रपूर यांचेकडे दि.२७/०७/२०१० रोजी एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहितीमध्ये दि.२८/०५/२००९ ला केशवराव पोशट्टिवार व इतर विरुध्द दिलेले तसेच दि.२९/०५/२००९ ला पोस्टे नागभीड येथे दिलेल्या व चौकशीस ठेवलेल्या अर्जाचे चौकशी बाबत एकूण ६ मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

३. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी आज आयोगासमोर जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२९/०७/२०१० रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपूरी यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे दि. ४/०८/२०१० रोजी हस्तांतर केला आणि त्याची प्रत अपीलार्थीस दिली. त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थीने मागितलेली माहिती ही पोलीस निरिक्षक नागभीड यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपुरी यांनी सदरचा अर्ज पोलीस निरिक्षक नागभिड यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविण्यात आला. अपीलकर्त्याच्या माहिती अर्जास अनुसरुन पोलीस निरिक्षक नागभिड यांनी त्यांचे दि. २५/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक यांनी सुनावणीचेवेळी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता हे पूर्वी पोलीस खात्यात सेवेत होते. आता ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी दि.२८/०५/२००९ आणि दि.२९/०५/२००९ रोजी पोलीस विभागाकडे मुलगा आणि सून यांच्या संदर्भात तक्रार केलेली होती. आणि त्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या चौकशीमध्ये घेतलेले बयान इ. ची माहिती त्यांनी मागितली होती. त्यास अनुसरुन पोलीस निरिक्षक नागभिड यांनी त्या तक्रार अर्जावर नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली असून त्या संदर्भातील माहिती दि.२५/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून अपीलकर्त्याने अप्पर पोलीस अधिक्षक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाला अनुसरुन त्यांनी अपीलार्थीस दि. ०६/०१/२०११ रोजी प्रस्तुत प्रकरणी फेर चौकशी करण्यासाठी पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी यांचेकडे दि.०५/०१/२०१० च्या पत्राने आदेश दिला होता. त्यास अनुसरुन आता नुकताच अहवाल दि. ०३/०२/२०११ रोजी त्यांच्याकडे दाखल झालेला आहे. सदरचा चौकशी अहवाल अपीलार्थीस व्यक्तीशः किंवा पोस्टाने पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, पोलीस निरिक्षक नागभिड यांनी त्यांच्याकडील दि.२५/०८/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच प्रस्तुत प्रकरणात पोलीस निरिक्षक ब्रम्हपुरी यांनी दि.०३/०२/२०११ रोजी फेर चौकशी अहवाल देखील सादर केला आहे तो अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्याची संमती अप्पर पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांनी दिलेली असल्यामुळे अपीलार्थीचे अपील हे अंशतः हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ती यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अप्पर पोलीस अधिक्षक यांचेकडे प्राप्त झालेला पोलीस निरिक्षक ब्रम्हपूरी यांच्या फेर चौकशीच्या अहवालाची प्रत अपीलार्थीस व्यक्तीशः किंवा पोस्टाने पाठविण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १६३०/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विजय केशवराव चन्ने<br>रा. मस्जीद जवळ, गांधी चौक, राजुरा<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद राजुरा<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय राजुरा<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०८/०२/२०११)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांच्या वतीने ॲड. गिरडकर हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे जनमाहिती यांनाच प्राधिकृत केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये दि.१३/०९/२०१० रोजी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या अर्जास अनुसरुन दि.११/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू सदर माहिती ही चुकीची दिलेली आहे असे अपीलार्थीचे म्हणणे आहे त्यामुळे त्यांनी दि. २८/१०/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद राजुरा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१८/११/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस दि.०७/१२/२०१० रोजी सदर निर्णय प्राप्त झाला. सदर निर्णयात अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत नमूद केले आहे. परंतू त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.३०/११/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे वतीने उपस्थित असलेले ॲड. गिरडकर यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निरिक्षक नगर परिषद राजुरा यांचेकडे माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये श्री प्रभाकर केशवराव चन्ने आणि श्री विजय केशवराव चन्ने यांनी नगर परिषदेकडे मालमत्ता विवरणपत्र मिळण्याकरिता केलेल्या अर्जाबाबतच्या माहितीच्या संबंधित १ ते ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिलेली आहे तसेच सदर माहितीमध्ये कोणतीही कागदपत्रे जोडलेली नाहीत. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले होते परंतू त्यानंतरही जनमाहिती अधिकारी यांनी चुकीचीच माहिती उपलब्ध करुन दिली त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्त्याचे वकील यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निरिक्षक नगर परिषद राजुरा श्री प्रभाकर रायपुरे हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने देखील जनमाहिती अधिकारी हेच हजर झाले आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१३/०९/२०१० रोजी प्राप्त झाला असून अपीलकर्त्याने ५ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे व सदर माहिती ही नगर परिषदेच्या आणि बांधकाम विभागाशी संबंधीत असल्यामुळे तिनही विभागांकडून माहिती मागवून संकलीत केली. आणि सदर माहिती

दि.११/१०/२०१० रोजी स्पीडपोस्टने अपीलार्थीस पाठविलेली आहे त्याची नोंद जावक रजिस्टरमध्ये केलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतू सदर माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. १८/११/२०१० रोजी घेण्यात येवून अपीलार्थीस माहिती पुरविणेबाबत आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार अपीलार्थी यांना पुन्हा माहिती पाठविण्यात आली. व सदर माहिती मध्ये श्री केशवराव चन्ने यांना मालमत्ता विवरण पत्रासंबंधीत करविभागाकडून तयार करण्यात आलेल्या नोटशिटची त्यावर बांधकाम शाखेने दिलेल्या अभिप्रायाची प्रमाणित प्रत देण्यात यावी असे नमूद केले आहे व त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती पुरविली. तसेच बांधकाम शाखेने दिलेल्या अभिप्रायाची प्रत देखील उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता यांचे वकील व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११/१०/२०१० च्या पत्रान्वये एकूण ५ ही मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचेप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे बांधकामशाखेने दिलेल्या अभिप्रायाची प्रत देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६२९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अमोल प्रभाकर हांडा<br>गोरा बाजार, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक<br>वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक<br>पोलीस अधिक्षक कार्यालय, वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०८/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३०/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांच्या वतीने ॲड. शिरपूरकर उपस्थित आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे सहाय्यक पोलीस अधिक्षक श्री उ. ज. जाधव हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्व्ये दि. १९/०३/२०१० रोजी श्री अश्विनी हांडा यांनी पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) पोलीस अधिक्षक कार्यालय वर्धा यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करुन त्यांच्या वैद्यकीय देयक (Medical Bill) बिलाबाबतची माहिती मागितलेली आहे.

३. अपीलकर्ता यांचे वकील यांनी सुनावणीचेवेळी युक्तिवाद करतांना आयोगापुढे सांगितले की, दि.१९/०३/२०१० रोजी च्या माहितीच्या अर्जाखालील अर्जान्वये श्री अश्विनी हांडा यांनी श्रीमती सुशिला हांडा यांच्या वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती केल्याबाबतची माहिती मागितली असता जनमाहिती अधिकारी यांचेकडून संपूर्ण माहिती मिळाली नाही. तसेच वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. वैद्यकीय प्रतिपूर्ती बिले मंजूर होण्यास टाळाटाळ केली जाते त्यामुळे त्याबाबतची व्यस्थितरित्या कोणतीच माहिती दिली जात नाही. म्हणून अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, जिल्हा वर्धा यांचेकडे दि.०४/०८/२०१० प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) वर्धा श्री एम. जे. नळे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १९/०३/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२२/०३/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही लेखाविभागाशी संबंधीत असल्यामुळे प्रमुख लेखालिपीकाने अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती काढली. आणि अपीलकर्ता यांना दि. १७/०४/२०१० च्या पत्रान्वये फी चा भरणा करण्याचे कळविले. परंतू अपीलकर्ता हे माहिती घेण्यास बऱ्याच कालावधीपर्यंत आले नाही त्यानंतर त्यांचे भाऊ श्री अश्विनी कुमार हांडा हे दि. ०८/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात आले व त्यांच्या भावा तर्फे सदरची माहिती मिळण्याची विनंती केल्याने तसेच ते या कार्यालयात आस्थापनेवर असल्याने सदरची माहिती ही त्यांच्या कुटुंबियांच्या बिलाशी संबंधित असल्यामुळे त्याची स्वाक्षरी घेवून रु. २४/- चे शुल्क भरुन घेवून त्यांना सदर माहिती देण्यात आली. अपीलार्थीला पत्र देवून सुध्दा ते उपस्थित न झाल्यामुळे अर्जदार यांचे भाऊ श्री अश्विनी कुमार हांडा हे दि. ०८/०७/२०१० रोजी या कार्यालयात येवून स्वतः उशिरा माहिती घेवून गेले आहेत असेही जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०८/२०१० ला प्रथम अपील दाखल केले तसेच पुन्हा द्वितीय अपील अर्ज त्याच विषयावर दि.२९/०९/२०१० रोजी प्राप्त झाला. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. ३०/१०/२०१० रोजी घेण्यात आली. सदर प्रथम अपीलाच्या सुनावणीस ते हजर राहू शकत नाही असे त्यांनी कळविल्यामुळे अपीलकर्ता यांना

दि. ०९/११/२०१० रोजी विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती देण्याचा निर्णय देवून माहिती पाठविण्यात आली.

६. अपीलकर्ता यांचे वकील व जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांची बिले मंजूरी बाबत आता अद्यावत काय वस्तुस्थिती आहे ही माहिती त्यांना पाहिजे आहेत्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, अपीलकर्त्याचे आता सर्व बिले प्राप्त झालेली असून त्यांची छाननी प्रक्रिया सुरु आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या वैद्यकीय प्रतीपूर्ती बिलांचे बाबत अद्यावत वस्तुस्थिती कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांची सर्व बिले त्यांच्याकडे प्राप्त झाली असून ती छाननी प्रक्रियेत आहेत असे अपीलार्थीस विनामुल्य पोस्टाने कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६३७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तुळशिराम मिताराम परशुरामकर<br>खोडशिवनी<br>ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय सडक अर्जुनी<br>ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत कार्यालय खोडशिवनी<br>ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा सचिव खोडशिवनी ता. सडक अर्जुनी यांचेकडे दि. २४/०२/२००९ रोजी खोडशिवनी ग्राम पंचायत निर्मल ग्राम म्हणून घोषीत करण्यात आले आहे. परंतु खोडशिवनी गावात १००टक्के शौचालयाचा वापर नाही भयंकर वाईट परिस्थिती आहे तरी निर्मल ग्राम घोषीत करुन बक्षीस व प्रमाणपत्र घेण्याचे सोंग करुन सुध्दा फसवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे.

म्हणून आदेशाची प्रत व तपासणी अहवालाची संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, खोडशिवनी ह्या गावास निर्मल ग्राम म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्याबाबतच्या आदेशाची तपासणी अहवालाची प्रत सचिव यांचेकडे मागितली असता त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे खंडविकास अधिकारी पंचायत समिती सडक अर्जुनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील माहिती मिळाली नाही त्यामुळे आयोागाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. २८/०२/२००९ रोजी प्राप्त झाला. त्या अर्जातील माहितीचा शोध घेण्यात आला परंतू अपीलार्थीने मागितलेली माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसल्यामुळे दि.२६/०३/२००९ रोजी त्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे पत्र पाठवून खोडशिवनी ग्रामपंचायत निर्मल ग्राम म्हणून घोषित करण्यात आले त्या आदेशाची प्रत व त्याबाबतच्या तपासणी अहवालाची प्रत ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाही म्हणून त्या प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आणि सदर माहिती ही जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडून प्राप्त झाल्यावर आपणास कळविण्यात येईल असे दि. २६/०३/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविण्यात आले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलार्थीने सदर पत्र मिळाल्याचे मान्य केले परंतू त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय ११/०५/२००९ रोजी घेण्यात आला असून ग्रामपंचायतच्या सचिवांनी जिल्हा परिषदेकडे प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती प्राप्त करुन अपीलार्थीस पुरवावी असे आदेश दिले आहे त्यानुसार जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे सचिव माहिती मागण्यास गेले असता तेथे वेबसाईटवर निर्मल ग्राम मंजूरी बाबतची गावाची माहिती मिळाली मात्र स्वतंत्र आदेश मिळाले नाही. तसेच तपासणी अहवालाची देखील प्रत मिळाली नाही मात्र खोडशिवनी ग्रामपंचायतीला निर्मल ग्राम घोषित प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येईल असे सचिव ग्रामपंचायत खोडशिवनी आणि संवर्ग विकास अधिकारी सडक अर्जुनी यांनी आयोगापुढे सांगितले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना काही माहिती मिळालेली आहे. परंतू निर्मल ग्राम मंजुरी व निर्मल ग्राम घोषित प्रमाणपत्राच्या झेराक्स प्रतीची माहिती त्यांना मिळालेली नाही ती त्यांना पाहिजे आहे त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सचिव, खोडशिवनी ग्रामपंचायत यांनी अपीलकर्ता यांना वेबसाईटवरुन प्राप्त केलेल्या निर्मल ग्राम मंजूरीची माहिती आणि निर्मल ग्राम घोषित प्रमाणपत्राची प्रत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.तसेच तपासणी अहवाल उपलब्ध नाही असे देखील कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. १६३६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजू शंकरराव निकोसे<br>मु. पो. सावरी (बिड)<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

### (आदेश पारित दिनांक ०९/०२/२०११)

### <u>नि र्ण य</u>

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.१६/१०/२०१० रोजी पक्षपात करुन दि. १५/०४/२००५ ला विहिरीचे अनुदान पंचायत समिती वरोरा येथे उपलब्ध असून लवकर काढून दिले नाही व दि.१४/०४/२००६ ला सदर विहीरीचे काम बंद करुन आर्थिक नुकसान केले त्याबाबत एकूण ७ मुद्यावर माहिती मागितलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या अर्जास अनुसरुन अपीलर्थीस यापूर्वीच माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता हा वारंवार राज्य माहिती आयोगाकडे अपील करीत असून त्याचा केवळ त्रास देण्याचा उद्देश आहे असे जनमाहिती अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. त्यामुळे अपीलकर्त्याने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याच्या वडिलांना सन ४-५ मध्ये विशेष घटक योजने अंतर्गत देण्यात आलेले विहीर अनुदान मंजूर झालेले असून त्या अनुदानाची रक्कम रु. ४८०००/- आहे आणि ती रक्कम अपीलकर्त्याच्या वडिलांना अदा करण्यात आलेली आहे. त्यानंतर सन ५-६ मध्ये विशेष अनुदान मंजूर झालेल्या विहिरींना अनुदान वाढून आले असून ते रु.६१५००/- झाले आहे. अपीलकर्ता यांना वाढीव अनुदान मिळण्यासाठी त्यांचा आग्रह आहे. परंतू सदरचे वाढीव अनुदान हे सन २००४-२००५ च्या विहीरींसाठी लागू नाही ते फक्त सन २००५-०६ च्या विहीरींसाठी लागू आहे. म्हणून अपीलकर्त्याच्या वडिलांना वाढीव अनुदान देता येणार नाही. आणि याबाबत अपीलकर्त्याच्या वडिलांचे काहीही म्हणणे नाही. मात्र केवळ त्रास देण्याच्या हेतुने अपीलकर्ता हे वाढीव रक्कम मिळावी म्हणून सारखे माहितीच्या अधिकारात अर्ज करीत असतात. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, यापूर्वी अपीलकर्ता यांनी आयोगाकडे अपील क्र. १७५७/२००७ हे दाखल केले होते. त्यामध्ये कु. एम जी. कारेकर कृषी अधिकारी यांचेशी विनयाभंगाची वागणूक त्यांनी केली व अश्लील प्रेम पत्र त्याने लिहिले याबाबत अपीलाच्या निर्णयात निष्कर्ष आलेला आहे. त्यामुळे अपीलकर्त्याची प्रवृत्ती त्रास देण्याची दिसून येते. व तसेही अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती माहिती त्यांना त्यांच्या इतर अनेक अर्जाच्या माध्यमातून उपलब्ध झालेली आहे. ते फक्त शब्द बदलून पुन्हा तीच तीच माहिती मागत असतात. त्यांचा माहिती अधिकाऱ्यांना केवळ त्रास देण्याचा उद्देश असतो. त्यामुळे अपीलकर्त्याचे यापूर्वीचे अपील क्र. १७५७/२००७, अपील क्र. १०६/२००८, अपील क्र. २२४/२००८, अपील क्र. ६५६/२००९, अपील क्र. ४३७/२००९ आणि अपील क्र. १०८१ /२००९ हे आयोगाने खारीज केले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

५.	यावरुन असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास जी वस्तुस्थिती आणून दिलेली आहे ती योग्य आहे म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६३५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजू शंकरराव निकोसे<br>मु. पो. सावरी (बिड)<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय चिमूर<br>ता. चिमूर जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय चिमूर<br>ता. चिमूर जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी पंचायत समिती, ता. चिमूर जि. चंद्रपूर यांचेकडे दि. ३०/०७/२०१० रोजी विशेष घटक योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहीरींच्या कामाच्या पाहणी बाबत तसेच अनुदान रकमे संदर्भात १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. मात्र अपेक्षेप्रमाणे

अर्जदारास माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०३/०८/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर आणि कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) पंचायत समिती यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांना पत्र देवून त्यांच्याकडून माहिती मागितली त्यास अनुसरुन जिल्हा कृषी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी दि. २४/०८/२०१० च्या पत्रान्वये मुद्या क्र. १ च्या माहिती बाबत कोणते दोन कृषी अधिकारी आहेत त्यांची नावे नाहीत. तसेच कोणत्या तारखेला व कोणत्या कामाची पाहणी केली याबाबत सविस्तर उल्लेख नाही त्यामुळे माहिती शोधता येत नाही असे सदर पत्रात नमूद केले आहे व तसे अर्जदारास दि.०१/०९/२०१० च्या पत्राने कळविण्यात आले आहे. त्यानंतर कृषी अधिकारी पंचायत समिती चिमुर यांनी दि.०७/०९/२०१० च्या पत्रान्वये त्यांचे संबंधित माहिती पाठविली, म्हणून मुद्या क्र. २, ३ व ४ ची माहिती अपीलार्थीस दि. ०८/०९/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच अपीलार्थीस दि.१८/१२/२०१० अन्वये पंचायत समिती अंतर्गत कार्यरत कृषी अधिकारी यांची दौरा दैनंदिनी पाठविण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांची मे २००६ ची दौरा दैनंदिनी अपीलकर्त्यास पाठविली होती परंतू अपीकर्त्याने ती स्विकारली नाही म्हणून त्याची प्रत आज आयोगासमोर उपलब्ध करुन दिली आणि ती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्विकारली.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ०१/०९/२०१०, ०८/०९/२०१०, १८/१२/२०१० आणि दि.२४/०१/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १६३८/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तुळशिराम मिताराम परशुरामकर<br>खोडशिवनी<br>ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय सडक अर्जुनी<br>ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत कार्यालय खोडशिवनी<br>ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०२/२०११)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत खोडशिवनी ता. सडकअर्जुनी गोंदिया यांचेकडे दि.२४/०२/२००९ रोजी ३ मुद्यांवर माहिती अधिकाराखाली माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहितीमध्ये त्यांनी झुडपी जंगलाचे जागेवर खोडशिवनी गावातील जनतेने अनेक घरे बांधली असता त्यांना बांधकामाची परवानगी, ग्राम पंचायतीने देऊन अतिक्रमणाला प्रोत्साहन दिले आहे. त्यांना

प्राथमिक गरजा लाईट, पाणी, रोडची व्यवस्था केली तरी ग्राम पंचायतीला याबाबत अधिकार आहेत काय अशी माहिती मागितलेली असून टपालाद्वारे माहिती घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या अर्जास अनुसरुन दि.२६/०३/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी सडक अर्जुनी गोंदिया यांचेकडे दि.१३/०४/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ११/०५/२००९ रोजी दिलेला दिसून येतो परंतू त्यानंतर अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, खोडशिवनी गावातील जनतेने झुडुपी जंगलाचे जागेवर अनेक घरे बांधली असून त्यांना बांधकामाची परवानगी ग्रामपंचायतीने देवून अतिक्रमणाला प्रोत्साहन दिले आहे त्यांना प्राथमिक गरजा लाईट, पाणी, रोडची व्यवस्था केली आहे तरी ग्राम पंचायतीला याबाबत अधिकार आहेत काय अशी विचारणा केली होती परंतू जनमाहिती अधिकारी यांनी दि. २६/०३/२००९ च्या पत्रान्वये असे कळविले की, गावात पाण्याची व्यवस्था करणे, लाईटची व्यवस्था करणे, रोडची व्यवस्था करणे हे ग्रामपंचयतीचे हे कर्तव्य आहे असे कळविलेले आहे. परंतू याबाबत अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सदर बांधकाम हे अतिक्रमणात येत असल्यास संबंधित अपीलकर्ता यांनी सदर बांधकामाची तक्रार वरिष्ठ अधिकारी यांचेकडे करावी असे निर्णयात नमूद केल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर दि. २६/०३/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये झुडुपी जंगलाचे जागेवर घर बांधकाम करण्याची ग्रामपंचयतीने मंजुरी दिलेली नाही तसेच लाईट, पाणी, रोडची व्यवस्था करणे हे ग्राम पंचायत कायद्याचे कलम ४५ (३) प्रमाणे ग्राम पंचायतीचे कर्तव्य आहे असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याचे सांगितले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, ग्रामपंचायत खोडशिवनी येथे वन विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे मात्र अतिक्रमण झालेली जागा ही वनविभागाची असल्यामुळे त्या जागेशी ग्राम पंचायतीचा कोणताही संबंध येत नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविलेले आहे ते योग्य आहे. त्यामुळे सदर जागा ही वनविभागाची असल्यामुळे अपीलकर्त्याने सदर अतिक्रमणाची तक्रार ही वनविभागाकडे करणे योग्य होईल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६५५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रमण मोतीराम बन्सोड<br>जिल्हाध्यक्ष, जनसेवा जयलक्ष अन्याय भ्र. निराकरण समिती महा.<br>केंद्रिय कार्यालय-न्यु अशिर्वाद नगर, गिरोला (कारधा)<br>ता.जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>पंचायत समिती मोहाडी<br>ता. मोहाडी जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>ग्राम पंचायत कार्यालय, जांब<br>ता. मोहाडी जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी जनमहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे वरिष्ठ सहाय्यक हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय जांब जि. भंडारा यांचेकडे दि.०२/०८/२०१० रोजी ग्राम पंचायतीसंबंधीची माहिती मागितलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जास अनुसरुन दि. ३१/०८/२०१० च्या पत्रान्वये फक्त मुद्या क्र. ५ संबंधीतची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते इतर ६ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १३/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. १७/०८/२०१० व दि. ३०/०८/२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी माहितीकरिता अपीलार्थीस शुल्काची मागणी केली असता अपीलकर्त्याने कोणताच प्रतिसाद दिलेला नाही व चालान सुध्दा जमा केले नाही म्हणून सदर प्रकरण नामंजूर करुन नस्तीबध्द करण्यात आले असा प्रथम अपीलाचा निर्णय झाला. त्यामुळे अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे दि.०२/१२/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

४. आज सुनावणीस आयोगापुढे अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला, त्यामध्ये अपीलकर्त्याने ग्रामपंचायत जांब बाबत १ ते ७ मुद्यांची माहिती मागितलेली आहे. म्हणून अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज ग्राम पंचायतच्या ग्रामसभेत ठेवण्यात आला. त्यामध्ये श्री रमण मोतीराम बन्सोड यांनी माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती त्यांना एकदा विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली असून त्यांनी पून्हा तीच माहिती मागितलेली आहे. त्यांना वारंवार विनामुल्य माहिती देणे ग्रामपंचायतीस आर्थिक दृष्टया परवडणार नाही. तसेच सदर माहिती ही फार जुनी असून मोठया प्रमाणात असल्यामुळे ग्रापंचायतीस ३ ते ४ हजार रुपयांचा खर्च येणार आहे त्यामुळे ऐवढा मोठा खर्च करणे ग्रामपंचायतीला परवडणार नाही म्हणून रु ५०/- पर्यंतची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य देण्यात यावी असे ग्रामसभेत ठरविण्यात आले. त्या ठरावास अनुसरुन दि. ३१/०८/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास एकूण ६९ पेजेसची माहिती उपलब्ध करुन दिली. तसेच सध्या ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती खालावलेली आहे अशा परिस्थितीत अपीलार्थीस विनामुल्य जास्त माहिती उपलब्ध करुन देणे ग्रामपंचायतीला शक्य नाही जी माहिती देता येणे शक्य आहे ती देण्यात आलेली आहे. त्यापेक्षा जास्त माहिती अपीलकर्त्यास पाहिजे असल्यास त्यांनी कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात प्रत्यक्ष

येऊन त्यांनी आवश्यक त्या माहितीचे निरिक्षण करुन घ्यावे त्याकरिता अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती निरिक्षणासाठी अवश्यक उपलब्ध करुन देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर असलेले वरिष्ठ सहाय्यक श्री व्ही. डी. ठाकूर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता कळविण्यात आले होते. मात्र अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित झाले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे माहितीकरिता शुल्क भरण्याचे अपीलकर्त्यास कळविण्यात आले परंतू त्यांनी कोणतीच रक्कम भरली नाही म्हणून त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

६. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.३१/०७/२०१० च्या पत्रान्वये ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे ६९ पेजेसची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६५६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. स्मिता माधवराव चांदेकर<br>द्वारा, रामचंद्र हरिभाऊ डोंगरे, प्लॉट क्र. १६/सी, रतन नगर,<br>माता मंदीर जवळ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्त्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी<br>गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी<br>शासकिय आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रामगड<br>ता. कुरखेडा जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ती यांनी दि. ३१/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ती हजर आहे. जनमहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री के.पी. बांते सहा. कार्यालय अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०४/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी शासकीय आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रामगड ता. कुरखेडा, जि. गडचिरोली

यांचेकडे सन २००५ ते २००९ पर्यंतचे प्रवास दैनिक भत्ता तसेच माहे जानेवारी २००७ चे तिन दिवसांचे थकीत वेतन व किरकोळ व्हाऊचर्स थकित रक्कमेबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अथवा कोणतीच माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.१२/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १३/०९/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांना आदेशीत केले की, अपीलकर्ती यांच्या थकीत प्रवास भत्ता देयकाची सविस्तर माहिती द्यावी. तसचे ती देयके चालू आर्थिक वर्षात (२०१०-११) मध्ये अनुदान उपलब्ध होताच मंजुर करुन घेण्याविषयी प्राधान्याने कार्यवाही करावी. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या देयकांसंबंधीतची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे मागितली असता जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना दि. ३०/१२/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली ती परिपूर्ण नाही. अपीलकर्तीस प्रवासभत्ता देयके तसेच रु ७६५/- चे बील त्यांना मिळालेले नाही सदर बीलाची नोंद जावक वहीत आहे तरी देखील ती बिले मिळालेली नाही असे अपीलकर्तीचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ती यांचा माहितीचा दि.०४/०५/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि.१२/०८/२०१० व दि.२०/०८/२०१० चे पत्र प्राप्त झाले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि. ३०/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तीस माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यावर अपीलकर्तीने सांगितले की, रु.७६५/- चे बील त्यांना मिळालेले नाही सदर बीलाची नोंद जावक वहीत आहे तरी देखील ती बिले मिळालेली

नाहीत. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ती यांचे रु.७६५/- चे बील आणि दोन प्रवास भत्ता देयके त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. म्हणून अपीलकर्ती यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष जावून जावक नोंदवहीची पाहणी करुन घेणे योग्य राहील. तसेच सदर बीले आढळल्यास त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी नियमांप्रमाणे कार्यवाही करणे देखील संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती हिने जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित राहून जावक रजिस्टरचे निरिक्षण करुन घ्यावे. व त्यामधील त्यांचे प्रवासभत्ता देयके आणि रु.७६५/- चे व्हाऊचर्स उपलब्ध झाल्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यावर नियमांप्रमाणे कार्यवाही करुन अपीलकर्तीस उपलब्ध करुन द्यावे. तसेच बिले उपलब्ध न झाल्यास त्याबाबत अपीलार्थीस स्पष्टपणे कळवावे.

२. अपीलकर्ती यांनी जावक रजिस्टरचे निरिक्षण करण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांना पूर्व सूचना देवून त्यांचे कार्यालयात हजर रहावे व जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस जावक रजिस्टर निरिक्षण करण्यास उपलब्ध करुन द्यावे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १६५४/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शेख सलीम शेख अकबर<br>इस्माईलपुरा, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद, नागपूर<br>सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर<br>सिव्हील लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०२/२०११)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १४/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर असून लेखी निवेदन दिले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि.३०/११/२००९ रोजी जिल्ह्यातील अल्पसंख्याक विद्यार्थी यांना देण्यात येणाऱ्या योजनांची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहितीचा कालावधी २००८-०९ ते २००९-१० पर्यंतचा दिलेला आहे. तसेच माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली परंतू ती खाजगी शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचीच माहिती देण्यात आली. मात्र नगर परिषद शाळा व जिल्हा परिषद शाळा यांची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि. १५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरदेखील माहिती अपूर्ण देण्यात आली म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्त्याने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे सुनावणीस उपस्थित आहेत त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यांनतर त्यांनी मागितलेल्या ३ ही मुद्यांची माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. त्यामध्ये अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या उपस्थिती भत्त्या बाबतची माहिती मागितली होती ती संकलन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे त्यानुसार त्यांच्या कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. व ती माहिती मिळाल्याचे अपीलार्थीने आयोगासमोर मान्य केले. परंतू फक्त खाजगी शाळांची माहिती त्यांना मिळालेली आहे मात्र नगर परिषद शाळा व जिल्हा परिषद शाळेची माहिती अद्यापही त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही असे अपीलार्थीने सांगितले. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, सदरची योजना शिक्षणाधिकारी निरंतर शिक्षण जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे वर्ग झालेले आहे परंतू ज्या कालावधीची माहिती मागितली आहे त्यावेळेला ही योजना प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयाकडे होती असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस ज्या प्रमाणे खाजगी शाळांची उपलब्ध करुन दिलेली आहे त्याचप्रमाणे नगर परिषद शाळांची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहिती प्रमाणे खाजगी शाळेच्या संबंधीत पुरविलेल्या माहितीप्रमाणेच नगर परिषद शाळांची माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. त्यासाठी अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संपर्क साधावा.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)<br>**राज्य माहिती आयुक्त**<br>**राज्य माहिती आयोग**<br>**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.<br>निवड नस्ती.

**उपसचिव**<br>**राज्य माहिती आयोग**<br>**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १५६५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री किशोर दत्तात्रय देशपांडे<br>श्रीराम वार्ड, पाच देवळाजवळ, रामाळा तलाव, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>जिल्हा न्यायालय, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक<br>जिल्हा न्यायालय, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०१/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर होते. जनमाहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. परंतू अपीलकर्ता यांनी सुनावणीची पुढील तारीख मागितली म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख १४/०२/२०११ देण्यात आली. दि. १४/०२/२०११ च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर असून लेखी निवेदन दिले आहे. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०७/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा न्यायालय गडचिरोली यांचेकडे युनायटेड इंडिया इन्शुरंस कंपनी लिमीटेड यांचे विरुध्द दाखल करण्यात आलेल्या प्रकरणाबाबतची जानेवारी २००८ ते जून २०१० या कालावधीतील८ मुद्यांची माहिती मागितलेली होती.

३. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि. २७/०७/२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यास नकार दिलेला आहे. त्यामध्ये Maharashtra District Court Right to Information Rule २००६ मधील तरतुदी नुसार माहिती संकलीत करुन देण्याची कोणतीही तरतुद नाही. जनमाहिती अधिकारी यांच्या या निर्णयावर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधिश - १ व अप्पर सत्र न्यायाधिश गडचिरोली यांचेकडे दि. १८/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील फेटाळल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचे मला माहिती न पुरविण्याचे कृत्य हे बेकायदेशिर असून सध्या प्रचलीत असलेल्या नियमानुसार नसल्याबाबत नमूद केले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी जाणूनबुजुन आपली जबाबदारी टाळून पुन्हा माहिती मागू नये यासाठी माहिती दिली नाही व सदर माहिती ही जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातून सहजरित्या उपलब्ध होवू शकते कारण माहिती ही त्यांच्या कार्यालयातच उपलब्ध आहे. तरीसुध्दा ते ती माहिती उपलब्ध करुन देत नाहीत. तसेच मोटार अपघात प्रकरणासंबंधी प्रशासकीय कामासाठी व युनायटेड इन्शुरंस कंपनी लि. यांच्या हक्कांचं संरक्षण करण्यासाठी माहिती मागितली होती. सदर माहिती ही झेरॉक्सच्या स्वरुपात मागणे शक्य नाही वे त्यांच्या प्रमाणित प्रती काढणे शक्य नाही म्हणून सदर माहिती ही कार्यालयातील नोंदवह्या, लेजर बुक, रोखीचे रजिस्टर यामधून मिळू शकते अशा प्रकारची माहिती त्यांना चंद्रपूर न्यायालयाकडून प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले. तसेच चंद्रपूर न्यायालयाने त्यांना माहिती पुरविलेली आहे त्याच आधारावर गडचिरोली न्यायालयाचे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती

पुरविणे आवश्यक आहे असेही अपीलार्थीचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने सुध्दा आज सुनावणीस उपस्थित आहेत त्यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील माहितीमध्ये मोटार अपघात दावा न्यायाधिकरण गडचिरोली येथील युनाईटेड इंडिया इन्शुरंस कंपनी लि. यांचे विरुध्द दाखल झालेल्या १ ते ८ मुद्यांची माहिती मागितली होती. परंतू मा. मुख्य न्यायाधिश मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा जिल्हा न्यायालयाला लागू करण्यासाठी त्यामध्ये अंशतः सुधारणा करुन सुधारित स्वतंत्र नियम तयार केले आहेत. त्यांना Maharashtra District Courts Right to Infornation Rule २००६ असे संबोधण्यात येत आहे. सदर नियम जिल्हा न्यायालयाला लागू आहेत. त्यानुसार अर्जदाराला न्यायिक प्रकरणांच्या बाबत माहिती पाहिजे असल्यास त्यांना मा. मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार विहीत केलेल्या प्रचलित नियमानुसार प्रमाणित प्रती मिळविता येवू शकतात. परंतू अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही न्यायालयीन प्रकरणाबाबतची असल्यामुळे व ती न्यायालयीन नोंदवह्या तसेच अभिलेख या मधून घेऊन त्याचे संकलन करुन द्यावयाचे असल्यामुळे ते उपरोक्त नियमानुसार देता येणार नाही. म्हणून अपीलकर्त्यास दि.२७/०७/२०१० च्या पत्रान्वये तसे कळविलेले आहे.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०१/१०/२०१० रोजी दिलेला असून अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या निर्णयात नमूद केले आहे की, मा. मुख्य न्यायाधिश मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी माहितीच्या अधिकाराचा कायदा अधिनियम २००५ जिल्हा न्यायालयांना लागू करण्यासाठी त्यामध्ये अंशतः सुधारणा करुन सुधारित नियम तयार केले आहेत. त्यांना Maharashtra District Courts Right to Infornation Rule २००६ असे संबोधण्यात येते. म्हणून सदर नियम जिल्हा न्यायालयांना लागू आहेत. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविणे बाबत घेतलेला निर्णय योग्य आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमूद केले आहे.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी उपस्थित केलेले मुद्दे व लेखी निवेदन यांचा विचार केला असता प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही न्यायालयीन प्रकरणाबाबतची असल्यामुळे ती न्यायालयीन नोंदवह्या तसेच अभिलेख यामधून घेऊन त्यांचे संकलन करुन द्यावयाचे असल्यामुळे ती मा. मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार विहीत केलेल्या प्रचलित नियमानुसार देता येणार नाही. तथापी अपीलकर्त्याला Maharashtra District Courts Right to Infornation Rule २००६ मधील तरतुदीनुसार अभिलेख्यांचे निरिक्षण करुन घेणे संयुक्तिक राहील. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून Maharashtra District Courts Right to Infornation Rule २००६ मधील तरतुदींप्रमाणे त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे अपीलकर्त्याने निरिक्षण करुन घ्यावे त्यासाठी अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांना कामकाजाचे दिवशी पूर्व सुचना देवून त्यांचे कार्यालयात रेकॉर्डच्या निरिक्षणासाठी उपस्थित रहावे. व अपीलकर्ता हे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी नियमानुसार आवश्यक ते रेकॉर्ड निरिक्षणासाठी त्यांना उपलब्ध करुन द्यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६६८/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तुळशिराम काशिराम कठाणे<br>रा. मोवाड (वार्ड नं.११)<br>ता. नरखेड जि. नागपूर -४४१ ३०३ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती वरुड<br>ता. वरुड जि. अमरावती | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>(कृषी विभाग) पंचायत समिती वरुड<br>ता. वरुड जि. अमरावती | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २६/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता यांचे वतीने त्यांचे पुत्र श्री नंदकिशोर तुळशिराम कठाणे हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी (कृषी विभाग) पंचायत समिती वरुड श्री देशमुख हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती वरुड हे उपस्थित आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.२१/०५/२०१० रोजी बैलजोडीची केस नामंजूर केल्याबाबत विशेष घटक योजने अंतर्गत बैलजोडी मिळण्याकरिता दि.०९/०७/२००९ ला अर्ज केलेला होता ती केस काही कारणास्तव नामंजूर करण्यात आली आहे. त्यासंबंधीत अपीलकर्त्याने त्यांचा शेतीचा प्रस्ताव का नामंजूर करण्यात आला आहे त्याची कारणे मागितलेली आहेत.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या अर्जास अनुसरुन दि.२६/०७/२०१० च्या पत्रान्वये बैलजोडी व इतर साहित्य बाबींसाठी निवड केलेला लाभार्थी ज्या तालुक्याचा आहे त्याच तालुक्यात त्यांना लाभ देण्यात यावा अशी सूचना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांनी कृषी विकास अधिकारी यांच्या सभेत दिलेल्या असल्यामुळे आपला अर्ज नामंजूर करण्यात आला आहे असे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे आत ही माहिती दिलेली नाही. तसेच दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे आणि याबाबत अशा कोणत्याही प्रकारचा शासन निर्णय नाही तरी देखील त्यांचा बैलजोडीचा अर्ज नामंजूर केलेला आहे असे अपीलार्थीचे म्हणणे आहे त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू सदरचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांचे पुत्र आज सुनावणीस हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली व ती दिशाभूल करणारी माहिती दिली त्यानंतर दि.१३/०७/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती वरुड यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही त्यांना अपूर्ण व खोटी माहिती मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.०१/०६/२०१० रोजी प्राप्त झाला. त्यात अर्जदाराने विशेष घटक योजने अंतर्गत दि.०९/०७/२००९ ला बैलजोडी मंजूरीसाठी करण्यात आलेला अर्ज नामंजूर झाल्याची कारणे विचारली त्याला अनुसरुन दि. २६/०७/२०१० च्या पत्राने अपीलार्थीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे सभेतील सूचने नुसार सदरचा अर्ज नामंजूर केला होता. कारण सदर सभेत अशा सूचना देण्यात आल्यात की, निवड केलेला लाभार्थी ज्या तालुक्याचा आहे त्याच तालुक्यात त्यांना लाभ देण्यात यावा. परंतू अपीलकर्ता हे वरुड तालुक्यातील नाही त्यामुळे त्यांना लाभ देता आला नाही असे नमूद करुन अपीलकर्त्यास कळविण्यात आले आहे. अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि. ०१/०६/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्याबाबतचे उत्तर दि.२६/०७/२०१० रोजी देण्यात आले. अपीलकर्त्यास ३० दिवसांचे आत माहिती का दिली नाही याबद्दल जनमाहिती अधिकारी यांनी असा खुलासा केले की, श्री तुळशीराम काशिराम कठाणे यांचा माहितीचा अर्ज दि. ०१/०६/२०१० रोजी प्राप्त झाला होता. परंतू जनमाहिती अधिकारी म्हणून १ महिन्याचे आत अपीलार्थीस माहिती देण्यास ते असमर्थ ठरले त्याचे कारण म्हणजे पंचायत समिती वरुड अंतर्गत कृषी विभागात कृषी अधिकारी यांचे कृषी अधिकारी (सामान्य), कृषी अधिकारी (विशेष घटक योजना) ही दोन पदे मंजूर आहेत या दोनही पदांचा कार्यभार त्यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तसेच जून महिन्यामध्ये गुण नियंत्रणाचे अत्यंत जबाबदारीचे काम असल्यामुळे त्यांना माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची माहिती मुदतीत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यास वेळ मिळाला नाही म्हणून ते अपीलकर्त्यास मुदतीत माहिती देवू शकले नाही. या अतिरिक्त कार्यबाहुल्यामुळे दि. २६/०७/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती पुरविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. १३/०७/२०१० रोजी दाखल झाले. त्यानंतर अपीलार्थीस दि.२०/०९/२०१० रोजी निर्णय देण्यात आला. आणि जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपील फेटाळल्याचे निर्णयात नमूद केले.

७.     अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेता प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक ती माहिती दि. २६/०७/२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे व जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सद्यपरिस्थिती अतिरिक्त दोन पदांचा व्याप असल्यामुळे अपीलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला आहे. त्यांनी जाणूनबुजुन माहिती देण्यास विलंब केल्याचे दिसून येत नाही. तरीसुध्दा माहितीचे अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्या अर्जांची दखल घेवून ३० दिवसाचे मुदतीतच अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी सक्त ताकीद त्यांना देण्यात येत आहे. तथापी अपीलकर्त्यास दि. २६/०७/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.     अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२.     अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६६९/नाग/२०१०</u>**

१. श्री केशव मनिराम चहांदे - **अपीलकर्ता**
रा. ५१०, अर्जुन अपार्टमेंट, चंदन नगर, उंटखाना चौक,
मेडिकल कॉलेज रोड, नागपूर - ९

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क) - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. सांघिक कार्यालय,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई-४०००१९

३. जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक (क-अंता-आस्था) - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
४ था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१

**(आदेश पारित दिनांक १८/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड मुंबई यांचेकडे दि.१७/०८/२०१० रोजी श्री एस. डी. डांगे, सहा. लेखापाल, ना.ग्रा. प्र. म.रा.वि. मंडळ, नागपूर हे वयाच्या ५६ व्या वर्षी जन्मतारखेत दुरुस्ती करण्याकरिता अर्ज करतात आणि त्यांची जन्मतारीख दि.११/०६/१९२६ ऐवजी दि.०९/०२/१९२९ अशी दुरुस्ती करण्यात आली. मी स्वत: वयाच्या २८

व्या वर्षी जन्मतारखेची खरी नोंद घेण्याकरिता वारंवार दि.२७/०२/१९८९ पासून मंडळास विनंती अर्ज सादर करुनही अजुनपर्यंत माझ्या अर्जाचा योग्य विचार केलेला नाही म्हणून या दोनही प्रकरणांमध्ये विसंगतीच्या कारणांची माहिती अपीलकर्त्याने मागितलेली आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि. ३०/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस मुद्या क्र. १ बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सेवा विनियम क्रं. ९ (२) मधील टिप (एक) नुसार सर्वसाधारणपणे, कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील जन्मतारखेसंबंधीच्या नोंदीमध्ये बदल करण्याकरिता केलेला कोणताही अर्ज त्याने मंडळाच्या सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीनंतर स्वीकारु नये असे नमूद केले असल्यामुळे अपीलार्थी यांनी त्यांच्या जन्मतारखेमध्ये बदल करण्याबाबत केलेली विनंती मान्य करण्यात आलेली नाही. असे मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ) यांनी दि. १२/०३/२००९ द्वारे अपीलार्थीस कळविल्याचे सदर पत्रात नमूद केले आहे. तसेच मुद्या क्र. २ मध्ये दि.२६/०७/२००५ रोजी मुंबईमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तळमजल्यावर असलेले कार्यालयातील जुने दप्तर पुरामुळे नष्ट झाल्याने श्री डांगे सहाय्यक लेखापाल यांची सेवापुस्तकात नोंदविलेली जन्मतारीख १९८३ साली दुरुस्त करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे दोनही प्रकरणातील विसंगती पडताळून पाहता येणे शक्य नाही. त्यामुळे श्री एस. डी. डांगे यांची जन्मतारीख दुरुस्त केल्यामुळे अपीलकर्त्याची जन्मतारखेची दुरुस्ती करता येणे शक्य नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी दि.३०/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविलेले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि. ३०/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहितीमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी सेवाविनियम क्र.९ (२) मधल टिप (१) नुसार सर्वसाधारणपणे कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकातील जन्मतारखेच्या नोंदी मधील बदल केलेला कोणताही अर्जकर्मचाऱ्याने मंडळाच्या सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीनंतर स्विकारु नये असे नमूद केले असल्यामुळे श्री चहांदे (अपीलकर्ता) यांनी त्यांच्या जन्मतारखे बाबत बदल करण्याबाबत केलेली विनंती मान्य करता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. त्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा

महाव्यवस्थापक म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई कार्यालय यांचेकडे दि. १७/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपीलाचा निर्णय दि. १८/१०/२०१० रोजी देण्यात आला असून सदरचे प्रथम अपील फेटाळण्यात आले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर दि. ३०/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही फार जुनी असून त्यासाठी सर्व साधनसामुग्री या कामाकडे वळवावी लागेल. २६ जुलै २००५ मध्ये मुंबईत झालेल्या अतिवृष्टीमुळे तळमजल्यावर असलेले कार्यालयातील जुने दप्तर पुराच्या पाण्यामुळे नष्ट झाले आहे व त्यामध्ये सुरक्षित ठेवलेल्या रेकॉर्डचे सुध्दा नुकसान झाले असल्यामुळे अपीलार्थीस माहिती देता येणे शक्य नाही त्याबाबत अपीलार्थीस कळविण्यात आले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या जन्मतारखेच्या नोंदी मध्ये बदल करता येत नाही याबाबतची माहिती अपीलार्थीस पुरविण्यात आलेली आहे. व श्री डांगे सहा. लेखापाल यांच्या जन्मतारखेत १९८३ साली झालेल्या दुरुस्तीबाबतची कागदपत्रे पुरामुळे नष्ट झाली आहेत ती आता उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे दोनही प्रकरणातील विसंगती पडताळून पाहणे शक्य नाही असे अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कळविले आहे ते वस्तुस्थितीला धरुन असून योग्य दिसून येते म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६७४/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संजय आर. पांडे<br>द्वारा भालचंद्र वाजपेयी,<br>प्लॉट नं. ३३५, हनुमान गली, हनुमान मंदिराजवळ, धरमपेठ नागपूर-१० | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्ध** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती<br>ता. जि. अमरावती | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती<br>ता. जि. अमरावती | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. आशिष राठी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री डी.एच. वानखडे निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क मोर्शी हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०९/०३/२०१० रोजी सन २००८-२०१० या वर्षात मानसी बिअर बार मध्ये वेगवेगळया ब्रँडच्या विक्री संदर्भात माहिती मागितलेली आहे. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती यांचेकडे दि. २१/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१९/१०/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे रजिस्टर्स या कार्यालयामध्ये दि.०८/१०/२०१० ते १२/११/२०१० पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी १०.०० ते ५.४५ या कालावधीमध्ये अवलोकन /पाहण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी मानसी बिअरबार धामणगाव रेल्वे यांनी विक्री केलेल्या ब्रॅण्ड बाबत माहिती मागितली होती. त्यामध्ये १) मॅकडॉल, २) डिप्लोमॅट, ३) इम्पेरियल ब्लू, (Segam) ४) ग्रिन लेबल, (Gilbees), ५) एम. डी. व्हिस्की, ६) व्हाईट मिसचीप, रोमानोळ ओडका, इतर ओडका एम. डी. रम या सर्व ब्रॉण्डची किती बम्पर व निपची विक्री करण्यात आली याबाबत माहिती मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१९/१०/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दारु विक्रीच्या ब्रँडबाबतच्या नोंदीच्या नोंदवह्या ह्या मोठ्या असल्यामुळे त्यांच्या छांयाकित प्रती काढणे शक्य नसल्याबाबतचा दुय्यम निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क चांदुर रेल्वे यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्त्याने सदर ब्रँड विक्रीच्या नोंदवह्या या जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात निरिक्षण करुन घ्याव्या असे प्रथम अपीलाचे आदेश देण्यात आले त्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या माहिती अर्जास अनुसरुन दुय्यम निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क चांदुर रेल्वे यांचे कार्यालयासाठी माहिती

संबंधित असल्याने व त्यांच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे तसेच मानसी बियर बार या खाजगी अनुज्ञप्तीधारकांचे संबंधीत असल्यामुळे ते प्राप्त करुन घेण्यासाठी दुय्यम निरिक्षक यांचेकडे याबाबत लेखी पत्र पाठविले. दरम्यानच्या काळात संबंधीत दुय्यम निरिक्षकाचे घरी घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट होवून त्यांची बहीन त्यात गतप्राण झाली व त्यांचे ३ वर्षाचे मुलीसह तीन जण २५ टक्के पेक्षा जास्त भाजले गेले. या गंभीर कारणास्तव संबंधीत दुय्यम निरिक्षक हे रजेवर गेले व म्हणून अनुज्ञप्ती धारक यांचेकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. कारण अर्जदाराने जी माहिती मागितलेली आहे त्या संबंधीत नोंदवह्या या मोठया व विस्तृत स्वरुपात असल्यामुळे त्यांच्या प्रती काढणे शक्य नाही. त्यामुळे माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध झाल्या नाहीत. तसेच सदर नोंदवह्या ह्या झेरॉक्स मशीन मध्ये सुध्दा बसत नाही. अपीलकर्त्याने माहिती अर्जात माहिती व्यक्तीशः घेण्याचे नमूद केले आहे परंतू ते कधीच कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आले नाहीत. जर ते कार्यालयात आले असते तर त्यांना माहितीच्या संबंधीत नोंदवह्या निरिक्षण करण्यासाठी उपलब्ध करुन देता आल्या असत्या. तथापी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज नाकारण्याचा मुळीच हेतु नाही. परंतू नोंदवहया या विस्तृत स्वरुपात असल्याने त्यांच्या झेरॉक्स निघु शकत नाही. ही बाब लक्षात घेऊन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्याने माहितीचे निरिक्षण करुन घ्यावे असेच नमूद केले आहे. मात्र नोंदवहयांचे निरिक्षणासाठी अपीलकर्ता हे कधीच कार्यालयात हजर झाले नाही त्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही यावरुन अपीलकर्ता यांना माहितीमध्ये काहीच स्वारस्य दिसून येत नाही. तसेच अपीलकर्ता हे कार्यालयातील कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देण्यासाठी वारंवार माहिती मागत असतात असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीमध्ये कोणतेही सार्वजनिक हित दिसून येत नाही. माहितीच्या अधिकारांतर्गत सार्वजनिक प्राधिकरणास त्रास देण्याचा त्यांचा हेतु दिसून येतो त्यामुळेच अपीलकर्ता हे कार्यालयात माहितीचे निरिक्षणासाठी हजर होत नाहीत असेही जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

६. अपीलकर्ता यांचे वकील तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या नोंदवह्या ह्या व्यापक व विस्तृत स्वरुपात असल्यामुळे त्यांच्या झेरॉक्स प्रती काढणे अशक्य आहे. तसेच झेरॉक्स मशीन मध्ये त्या बसत नाहीत. परंतू

हल्ली जम्बो झेरॉक्स मशीनमध्ये अक्षरे रिडयूस करण्याचे तंत्र उपलब्ध आहे ही बाब लक्षात घेऊन अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांना रिड्यूस करुन उपलब्ध करुन देता येईल असे अपीलकर्त्याच्या वकीलाचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना रिड्यूस करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती रिडयूस करुन झेरॉक्सच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १६४३/नाग/२०१०**

१. श्रीमती निर्मला श्यामसुंदर शर्मा - **अपीलकर्ती**
पी डब्ल्यु. डी. रेस्ट हाऊसच्या जवळ, बेद ले- आऊट, गोपूरी, वर्धा
ता. जि. वर्धा.

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा
ता. जि. वर्धा.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा
ता. जि. वर्धा.

**(आदेश पारित दिनांक १०/०२/२०११)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ती यांनी दि. २३/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा यांचे तर्फे श्री के. व्ही. शिरपुरकर प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखालील दि.०५/०६/२०१० च्या अर्जान्वये सिव्हील सर्जन वर्धा द्वारा नंबर ६५५ दिनांक २२/११/१९८२ रोजी अमीनुद्दीन शेख ला जे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले आहे त्या वैद्यकीय प्रमाणपत्राची सत्यप्रत मागितलेली दिसून येते. सदर माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीला दि. २७/०७/२०१० च्या पत्रान्वये सदर बाबतीत काहीही बोध होत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांनी दि.२६/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाची सुनावणी न घेता प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय वर्धा यांनी दि. २३/०९/२०१० च्या पत्रामधे जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर आहे असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ती यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी अमुनोद्यीन शेखबाबत वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत मागितली होती परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि. २३/०९/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर असून माहितीचा कालावधी हा २० वर्षे पेक्षा जास्त असल्याने या कार्यालयात सदरचा रेकॉर्ड उपलब्ध नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पत्रात नमूद करुन कळविलेले आहे. त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ती यांच्या माहिती अर्जास अनुसरुन दि.१४/०७/२०१० रोजी अभिलेख कक्षास पत्र देवून माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले. श्री अमोनुद्यीन शेख यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्र क्र. ५६६ चा शोध घेतला असता, अभिलेख कक्षात ते दिसून आले नाही कारण सदर माहिती ही २८ वर्षे जुनी आहे तसेच रुग्णालयातील बांधकामाचे वेळी अभिलेखे इतरत्र हलविल्यामुळे सदर माहितीचा शोध घेणे अशक्य आहे त्याबाबत अपीलार्थीस दि.२७/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री शिरपुरकर यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्याकडे अपीलार्थीचे प्रथम अपील दाखल झाले. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही २० वर्षापेक्षा जास्त जुनी असल्याने सदर रेकॉर्ड त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होत नाही तसे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस

दि.२७/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले आहे ते बरोबर व योग्य असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असता प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही २० वर्षापेक्षा जास्त जुनी असल्यामुळे व बांधकामामुळे संपूर्ण रेकॉर्ड इतरत्र हलविण्यात आल्यामुळे सदर माहितीचा शोध घेणे अशक्य आहे. तसेच याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२७/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविले सुध्दा आहे म्हणून अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६४२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती निर्मला श्यामसुंदर शर्मा<br>पी डब्ल्यु. डी. रेस्ट हाऊसच्या जवळ, बेद ले- आऊट, गोपूरी, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **अपीलकर्ती** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय (लेखा-२), वर्धा<br>ता. जि. वर्धा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ती यांनी दि. २३/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०३/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ती हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०५/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे श्री अमुनोद्दीन शेख लघुलेखक यांच्या अस्थिव्यंग प्रमाणपत्राची प्रत मागितली होती. तसेच अपंगत्व प्रमाणपत्राच्या आधारावर त्यांना वाहनभत्ता दि. ०२/१२/१९९४ पासून दिला आहे काय? या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि. २२/०६/२०१० च्या पत्रान्वये उत्तर पाठविलेले दिसून येते. सदर पत्रामध्ये श्री अमीनोद्दीन शेख, लघुलेखक यांना या कार्यालयाद्वारा सद्यस्थितीत अपंगत्व प्रमाणपत्राच्या आधारवार वाहन भत्ता दिल्या जात नाही तसेच अपीलार्थीने मागितलेली वैद्यकीय प्रमाणपत्राची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक वर्धा यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे नमूद केलेले दिसून येते. परंतू अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.२७/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय  यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४.	अपीलकर्ती यांनी सुनावणीचीवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.२२/०६/२०१० च्या पत्रात श्री अमीनोद्दीन शेख, लघुलेखक यांना या कार्यालयाद्वारा सद्यस्थितीत अपंगत्व प्रमाणपत्राच्या आधारवार वाहन भत्ता दिल्या जात नाही तसेच अपीलार्थीने मागितलेली वैद्यकीय प्रमाणपत्राची माहिती शल्य चिकित्सक वर्धा यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे नमूद करुन कळविलेले आहे. परंतू ही माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे असे अपीलकर्तीचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांनी दि. २७/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

५.	जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा श्री किशोर प्रभाकर शेंडे, अव्वल कारकुन (लेखा शाखा-२) वर्धा आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा श्रीमती सुलोचना निगडे हे आजच्या सुनावणीस आयोगापुढे उपस्थित आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की,  अपीलकर्तीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दि.०५/०६/२०१० रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन अपीलकर्तीस दि.२२/०६/२०१० च्या पत्रान्वये उत्तर पाठविलेले आहे. अपीलकर्तीने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणून श्री अमुनोद्दिन शेख यांना दि.१०/०६/२०१० च्या पत्रान्वये वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत अपीलार्थीस पुरविणेबाबत संमती मागितली होती. त्या पत्रास अनुसरुन त्रयस्थ पक्ष यांनी दि.१६/०६/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तीस त्यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत देण्यात

येऊ नये कारण वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन त्यांच्या शरिराच्या नाजुक भागाची माहिती अपीलार्थीस मिळेल व त्या भागावरच गुडांकरवी त्यांचेवर अपीलार्थी प्राणघातक हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे त्यांच्या जिवाला धोका संभवू शकतो कारण अपीलकर्ती व त्रयस्थ व्यक्ती यांचे प्लॉट मोजणीच्या संदर्भात वाद सुरु आहे त्यामुळे अपीलकर्तीस त्यांची माहिती देण्यात येवू नये असा आक्षेप त्रयस्थ पक्षाने नोंदविलेला आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच त्यांच्या कार्यालयाकडून सद्यस्थितीत अपंगत्व प्रमाणपत्राच्या आधारावर वाहनभत्ता दिला जात नाही. तसेच त्यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत जिल्हा शल्यचिकित्सक वर्धा यांचा रेकॉर्ड असल्यामुळे त्यांचेकडून ती प्रत उपलब्ध करुन घ्यावी असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले असल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

६. प्रथम अपीलीय अधिकारी श्रीमती सुलोचना निगडे यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाले. त्याला अनुसरुन प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्यामध्ये असे दिसून आले की, अर्जदाराने मागितलेली माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे व त्रयस्थ पक्षाने कळविल्यानुसार वैद्यकीय प्रमाणपत्र (अस्थिव्यंग) प्रमाणपत्राची प्रत अर्जदारास दिल्यास अर्जदाराकडून त्रयस्थ पक्षाच्या जिवास हानी संभवते कारण त्रयस्थपक्ष व अपीलार्थी यांच्यात प्लॉटचा वाद आहे आणि शरिराच्या नाजूक भागाची माहिती अपीलार्थीस दिल्यास अपीलार्थीकडून गुंडाकरवी त्रयस्थ इसमाच्या शरिराच्या नाजूक भागावर हल्ला होवू शकतो असे त्रयस्थपक्षाने कळविल्यामुळे त्रयस्थ पक्षाची विनंती लक्षात घेवून सदरचे प्रथम अपील फेटाळण्यात आले आहे.

७. अपीलकर्ती तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असताअसे दिसून येते की, सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे व त्रयस्थ पक्षास अपीलार्थीने विचारलेली माहिती देण्यास विचारणा केली असता त्रयस्थ व्यक्तीने ती नाकारलेली आहे. कारण त्यांच्या जिवातास हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच जनमाहिती अधिकारी यांनी याबाबत अपीलार्थीस दि.२२/०६/२०१० च्या पत्रान्वये कळविले असल्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६६७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रदीप नामदेवराव बावणे<br>बिडकर वार्ड, पाण्याच्या टाकीजवळ, हिंगणघाट<br>ता हिंगणघाट जि. वर्धा - ४४२ ३०१ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद हिंगणघाट<br>ता हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा नगर पालिका अभियंता<br>नगर परिषद हिंगणघाट<br>ता हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी नगर परिषद, ता. हिंगणघाट जि. वर्धा यांचेकडे दि.२७/०१/२०१० रोजी श्री संजय वामनराव खडसे यांनी केलेल्या अतिक्रमण हटवून जागा खुली करुन देण्याबाबत तक्रार अर्ज दिले त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती आणि श्री खडसे यांनी नवीन रोडच्या बांधकामासाठी नगरपालिकेकडून मंजुरी घेतली काय? अशा दोन मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जास अनुसरुन दि. २०/०२/२०१० च्या पत्रान्वये मुद्या क्र. १ बाबत बिडकर वार्ड मधील पाण्याच्या टाकीच्या दक्षिणेस ले आऊट मधील ओपन स्पेसवर श्री संजय वामनराव खडसे यांनी अतिक्रमण केल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आले. त्यानुसार दिनांक १४/१२/२००९ ला या कार्यालयाद्वारा अतिक्रमण धारकास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५५ अंतर्गत सुचना निर्गमित केली आहे असे नमूद केले आहे. तसेच मुद्या क्र. २ बाबत या कार्यालयाद्वारे टिनाचे पक्के शेड बांधणे बाबत कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही असे नमूद केले आहे. परंतू सदर माहितीने समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेकडे दि.१२/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ३१/०७/२०१० रोजी देण्यात आला आहे. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी तथा नगर पालिका अभियंता यांना अपीलार्थीस ७ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिले असून सदर प्रथम अपील निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दि. ०४/१२/२०१० रोजी दाखल केले आहे.

४. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे आयोगापुढे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा नगर पालिका अभियंता, नगर परिषद हिंगणघाट हे हजर आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या अर्जास अनुसरुन त्यांनी दि. २०/०२/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती सविस्तरपणे अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू त्यानंतरही अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या आदेशात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे ओदश दिल्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास दि.०१/१०/२०१० च्या पत्रान्वये पुन्हा सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले त्यानंतरही अपीलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५.	प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांनी दि.२०/०२/२०१० च्या पत्रान्वये व ०१/१०/२०१० च्या पत्रान्वये सविस्तरपणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६६६/नाग/२०१०</u>**

१. सौ अंजली दिलीपराव काळे - **अपीलकर्ती**
रा. आश्रय कॉलनी दे. गो. तुकुम, शिवाजी नगर, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक १७/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ती यांनी दि. २९/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १७/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ती गैरहजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. आयोगापुढे आज सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हे गैरहजर असल्यामुळे दोनही पक्षांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. किंवा त्यांनी कोणताही लेखी खुलासा किंवा निवेदन आयोगाकडे सादर केलेले नाही.

३. अपीलकर्ती यांनी दि.२९/११/२०१० रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावरुन असे दिसून येते की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, वरोरा जि. चंद्रपूर

यांचेकडे मौजा खोजी ग्रामपंचायत बोर्डा ता. वरोरा सर्वे नं. २७५/१ मध्ये उत्तर दक्षिण हायटेन्शन लाईन होती या लाईनवर पूर्व-पश्चिम लाईन ही विवेकानंद ज्ञानपीठ कॉलेज पासून जोडण्यात आलेली आहे ही लाईन कोणत्या तारखेस जोडली गेली याबातची माहिती मागितलेली दिसून येते.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन कोणताही कागदोपत्री पत्रव्यवहार केलेला दिसून येत नाही. तसेच अपीलकर्तीने दि.०४/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले असे दिसते. परंतू सदर प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णयाबाबत कोणतेही कागदपत्रे जोडलेली दिसून येत नाही.

५. तथापी माहितीच्या अर्जावरुन असे दिसून येते की, अपीलकर्तीस नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा अर्थबोध होत नाही. अपीलकर्तीने माहितीच्या अर्जान्वये हायटेन्शन लाईन बाबतची माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितलेली दिसते. परंतू माहितीच्या अधिकारात प्रश्नार्थक स्वरुपात माहिती देणे अपेक्षीत नाही. त्यामुळे अपीलकर्तीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६७१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष<br>द रॉयल व्हेटेरिनरिअंस सोसायटी ऑफ इंडिया,<br>४७७, हिवरी ले-आऊट, नागपूर -४४० ००८ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी (स्व)<br>महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा पशुचिकित्सा अधिकारी (कोंडवाड विभाग)<br>महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०२/२०११)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०२/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा पशुचिकित्सक, आरोग्य विभाग, महानगर पालिका, नागपूर यांचेकडे दि.१२/०८/२०१० रोजी द. रॉयल व्हेटेरिनरीअंस ऑफ इंडिया या संस्थेने महानगर पालिका नागपूर करिता भटक्या कुत्र्यांना पकडून शस्त्रक्रियागृहापर्यंत घेवून जाण्याचे काम केले. आरोग्य अधिकारी (स्व) यांच्या कार्यालयीन पत्र क्र. एचओ/१९७०/एमआयएससी दिनांक ०४/०३/२००८ अन्वये सदर काम करणे बंद करावे लागले. संस्थेने नोव्हेंबर, डिसेंबर २००७ व जानेवारी, फेब्रुवारी २००८ या काळात

महानगर पालिके करिता केलेल्या कामाच्या देयकांचे भूगतान अद्याप करण्यात आले नाही. करिता संस्थेने केलेल्या कामाचे भूगतान थांबविण्याचे कार्यालयीन आदेश निर्गमित झाले असल्यास त्या आदेशाची प्रत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन दि. ०७/०९/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.२६/०९/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११/१०/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१२/०८/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा पशुचिकित्सा अधिकारी मनपा यांचेकडे भटक्या कुत्र्यांच्या जननियंत्रण शस्त्रक्रियेकरिता कुत्र्यांना पकडून शस्त्रक्रियागृहापर्यंत नेण्याचे काम केले मात्र संस्थेने काम केल्याचे भुगतान थांबविण्याच्या कार्यालयीन आदेश निर्गमित झाले असून त्याची प्रत मागितली असता जनमाहिती अधिकारी यांनी दि.०७/०९/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपीलाचा निर्णयात जनमाहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्याचे आदेश दिले असतांनाही अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी तथा पशुचिकित्सा अधिकारी डॉ सतीश भोयर यांनी आयोगापुढे सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. १२/०८/२०१० चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर संस्थेने केलेल्या कामाचे भुगतान थांबविण्याचे कार्यालयीन ओदश उपलब्ध नाही असे दि.०७/०९/२०१० ला अपीलार्थीस कळविले होते. त्यानंतर अपीलार्थीने दि.२६/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांना दि. १८/१०/२०१० च्या पत्रान्वये सुधारित माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी (मनपा) डॉ. सतीश गणवीर हे आज आयोगापुढे सुनावणीस उपस्थित असुन त्यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर दि.०६/१०/२०१० रोजी सुनावणी घेऊन दि.११/१०/२०१० रोजी आदेश पारित करुन दि. १८/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस सुधारित माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. द. रॉयल व्हेटेरिनरिअंस सोसायटी ऑफ इंडिया चे अध्यक्ष डॉ. बलवंत मेश्राम हे नागपूर महानगर पालिकेत पशु वैद्यकीय अधिकारी (लोकमं) या पदावर कार्यरत आहेत व त्यांचेवर विभागीय चौकशी चालू असल्यामुळे प्रशासकीय स्तरावर द. रॉयल व्हेटेरिनरिअंस सोसायटी ऑफ इंडिया चे देयक थांबविण्यात आले आहेत अशी सुधारित माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या विभागीय चौकशीचा संबंध संस्थेच्या भूगतान थांबविण्याशी जोडणे हे योग्य नाही. म्हणून भुगतान थांबविण्याची केलेली कार्यवाही अन्यायकारक आहे असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, द. रॉयल व्हेटेरिनरिअंस सोसायटी ऑफ इंडिया चे अध्यक्ष डॉ. बलवंत मेश्राम हे नागपूर महानगर पालिकेमध्ये पशु वैद्यकीय अधिकारी (लोकमं) या पदावर कार्यरत असून त्यांच्यावर विभागीय चौकशी चालू असल्यामुळे प्रशासकीय स्तरावर द. रॉयल व्हेटेरिनरिअंस सोसायटी ऑफ इंडिया चे देयक थांबविण्यात आले आहे अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांचे याबाबत असे म्हणणे आहे की, विभागीय चौकशीचा संबंध पेमेंट थांबविण्याशी जोडणे योग्य नाही परंतू ही बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही त्यासाठी अपीलकर्ता यांनी सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य व संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**